संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 3 | Issue : 8 | Marathi Monthly | Thane, 1 February 2026 to 28 February 2026 | Pages 16 | Price : 10/-

# राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या पुण्यतिथीनिमित्त, ठाण्यात 'हुतात्मा दिन' संपन्न!

## धर्मराज्य पक्ष, ठाणे काँग्रेस आणि मूलभूत अधिकार संघर्ष समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात, डॉ. विवेक कोरडे व कॉ. आनंद तेलतुंबडे यांचे तडाखेबंद भाषण



**ठाणे :** भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ७८व्या पुण्यतिथीनिमित्त, धर्मराज्य पक्ष, ठाणे काँग्रेस आणि मूलभूत अधिकार संघर्ष समिती यांच्या संयुक्त विद्यमाने, दि. ३० जानेवारी-२०२६ रोजी, ठाण्यातील मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या सभागृहात 'हुतात्मा दिन' साजरा करण्यात आला. ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत डॉ. विवेक कोरडे व डाव्या चळवळीतील विद्रोही नेते कॉ. आनंद तेलतुंबडे यांनी, गांधीहत्या आणि आपण... या विषयावर आपले मनोगत व्यक्त करुन, उपस्थितांना मार्गदर्शन केले. 'धर्मराज्य पक्षा'चे अध्यक्ष तथा ज्येष्ठ कामगार नेते मा. राजन राजे यांच्या पुढाकाराने संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी काँग्रेसच्या अर्थ विभागाचे अध्यक्ष विश्वास उटगी, आयटकचे कॉ. उदय चौधरी, अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नेत्या वंदनाताई शिंदे, मूलभूत अधिकार संघर्ष समितीचे डॉ. जावळे, समाजवादी नेते संजय मं. गो., जगदीश खैरालिया, आंबेडकरवादी विचारवंत आनंदा होवाळ, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे ठाणे उपजिल्हाप्रमुख प्रदीप शिंदे, काँग्रेसचे ठाणे जिल्हा सरचिटणीस महेंद्र म्हात्रे, काँग्रेस ठाणे सचिव राहुल पिंगळे, ॲड. नाना अहिरे आदी मान्यवर मंडळींची प्रमुख उपस्थिती होती. दरम्यान, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. विवेक कोरडे यांनी, आपल्या भाषणात उपस्थितांना संबोधित करताना, गांधीहत्येमागील कारणे विषद करताना तथाकथित हिंदुत्ववादी व आरएसएसवर एकच शरसंधान साधले. महात्मा गांधी हे कधीही देशाची फाळणी व्हावी या विचाराचे नव्हते, उलट त्यांचा देशाच्या फाळणीला विरोधच होता. ज्या आरएसएसने ...पृष्ठ क्र. ८ वर



अंतरंग



कैसा हराया..?
...मोहसीन शेख
पृष्ठ क्र. ५



हिंदू विरुध्द हिंदू...
डॉ. प्रशांत गंगावणे
पृष्ठ क्र. १०



ठाकरे ७२-७३ वर पोहोचणं म्हणजे पराभव नाही तो सत्ताधाऱ्यांना दिलेला इशारा आहे
पृष्ठ क्र. ११

डॉ. दत्ता सामंतांच्या भांडवली-व्यवस्थेकडून झालेल्या निर्घृण हत्येला जवळपास तीन दशके पूर्ण होत असताना....
....राजन राजे (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)
पृष्ठ क्र. १२

# नेताजी सुभाषचंद्र बोसांच्या मृत्यूनंतर, आझाद-हिंद सेनेसाठी इतिहासातील खरा कसोटीचा काळ...



नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या निधनानंतर 'आझाद-हिंद सेना' इतिहासाच्या एका कठीण वळणावर उभी राहिली. नेतृत्त्व हरपले, जपानचा पराभव झाला आणि 'INA'चे सैनिक ब्रिटिशांच्या ताब्यात गेले. लष्करीदृष्ट्या ही सेना विस्कळीत झाली, अनेकांवर देशद्रोहाचे खटले चालवले गेले. त्याक्षणी प्रश्न फक्त सेनेचा नव्हता, तो देशाच्या आत्मसन्मानाचा होता.

याच काळात भारतातील राष्ट्रीय नेतृत्व खऱ्या अर्थाने पुढे आले. जवाहरलाल नेहरु यांनी, 'INA' अधिकाऱ्यांसाठी न्यायालयात उभे राहून देशभक्तीची साक्ष दिली. सरदार वल्लभभाई पटेल यांनी, सैनिकांवरील कठोर शिक्षांना विरोध करत, पुनर्वसनाची मागणी केली. डॉ. राजेंद्र प्रसाद आणि काँग्रेस नेतृत्वाने मखछअम सैनिकांना देशभक्त म्हणून मान्यता मिळावी यासाठी राजकीय लढा दिला. परिणामी, 'INA'चे लष्करी अस्तित्व संपले असले तरी, तिचा त्याग-सन्मान आणि प्रेरणा भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अढळ ठरली.

याउलट, त्या काळातील हिंदुत्ववादी प्रवाहांची भूमिका वेगळी होती. हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांनी 'INA'च्या समर्थनार्थ ठळक, आंदोलनात्मक भूमिका घेतल्याचे ऐतिहासिक पुरावे दिसत नाहीत. वि.दा. सावरकर यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, ब्रिटिश सैन्यात भरतीचे आवाहन केले, जे 'INA'च्या सशस्त्र मार्गाच्या विरुद्ध होते. त्यामुळे आझाद-हिंद सैनिकांच्या न्यायासाठी उभ्या राहिलेल्या जनआंदोलनात हा प्रवाह अलिप्त राहिला.

**निष्कर्ष असा की, आझाद-हिंद सेनेचा इतिहास आपल्याला शिकवतो, स्वातंत्र्य ही केवळ घोषणा नसते; तर, ती धैर्य-त्याग आणि निर्णायक कृती मागते. मखछअ'च्या सैनिकांना न्याय व सन्मान मिळवून देण्यात ज्या नेतृत्वाने प्रत्यक्ष पुढाकार घेतला, त्याच भूमिकेने राष्ट्राच्या स्मरणात स्थान मिळवले. इतिहास शेवटी विचारधारांपेक्षा कृतींचा हिशेब ठेवतो आणि तो हिशेब स्पष्ट आहे.**

***सत्य सत्य होता है,***
***नाम मे क्या रक्खा है!***

(समाजमाध्यमातून साभार...)

# १० वर्षांच्या न्यायालयीन संघर्षानंतर, दिल्ली उच्च न्यायालयाचा वैमानिकांना मोठा दिलासा....



या उच्च न्यायालयीन निर्णयानुसार, दीर्घकाळ नाकारली गेलेली पगारवाढ, अधिक तास काम केल्याचा मोबदला (Incentives for Extra Work) आणि इतर सोयीसुविधांचा थकीत कायदेशीर परतावा (Legal Sues) मिळण्याचा संबंधित हवाई वहातूक कर्मचाऱ्यांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे...धक्कादायक बाब ही की, एका वैमानिकाने थकीत पगार मागितल्याबद्दल त्याला बेमुर्वतखोर व्यवस्थापनाने कामावरुन काढून टाकून उर्वरित कर्मचाऱ्यांमध्ये 'कंपनी-दहशत' (Corporate-Terrorism) माजवली होती; त्या कर्मचाऱ्याला भरपाईसह कामावर घेण्याचा आदेश दिला गेलाय.

आपल्या कामादरम्यान अधूनमधून कधितरी 'पर्यवेक्षका'ची कामगिरी (Supervisory Role) करावा लागला किंवा पगार अव्वाच्यासव्वा मोठा आहे म्हणून, पायलट अथवा कॅप्टन, हा 'व्यवस्थापक' (Manager) ठरत नाही; तो त्याच्या कामाच्या एकूण स्वरुपावरुन (म्हणजे, मुख्यतः विमान चालवणे व बाकी व्यवस्थापकीय प्रक्रियेत सहभाग नसणे) औद्योगिक विवाद कायदा, १९४७ यातील कलम २(s) नुसार 'कामगार'च असतो!

यासंदर्भात, 'बंगलोर वॉटर सप्लाय' दाव्यातील सर्वोच्च निकालाअंतर्गत सिद्ध झालेले, ''कामगार-कायद्याचा अर्थ, स्वतंत्रपणे (In Isolation) इतरेसंदर्भीय बाबींपासून फटकून राहिल्यासारखा वेगळा न लावता, तो सर्वंकषपणे कामाचं एकूणात स्वरुप पाहूनच लावला गेला पाहिजे'', हे महत्त्वपूर्ण तत्त्व पुन्हा नव्याने अधोरेखित करण्यात आलंय, हे विशेषच.

यासिवाय वाचा : नोकरीतून अन्यायकारकरित्या काढून टाकलेल्या कर्मचाऱ्याला तब्बल १३ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे न्यायालयाचे आदेश....

# ना. प्रताप सरनाईक यांच्या चेणे, येथील प्रकल्पावर एनजीटीची टांगती तलवार

## पर्यावरण नियमांच्या उल्लंघनाप्रकरणी नोटीस जारी

**ठाणे: ठाणे जिल्ह्यातील चेणे गावात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात नियमांचे उल्घन करून बांधकाम केल्याप्रकरणी आमदार प्रताप सरनाईक यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. या संदर्भात दाखल केलेल्या अर्जाची दखल घेत नॅशनल ग्रीन ट्रिब्युनलच्या पुणे खंडपीठाने प्रताप सरनाईक, संबंधित कंपन्या आणि सरकारी प्राधिकरणांना नोटीस बजावून ४ आठवड्यांत उत्तर सादर करण्याचे आदेश दिले आहेत.**

### नेमके प्रकरण काय ?

सुरेश मारोतराव येवले यांनी एनजीटी मध्ये मूल अर्ज दाखल केला आहे. या अर्जात असा आरोप करण्यात आला आहे की, ठाणे जिल्ह्यातील चेणे गावातील सर्व्हे क्र. ९७ आणि ९८ येथील जमीन ही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या इको सेन्सेटिव्ह झोन मध्ये येते. या भागात प्रताप सरनाईक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. तर्फे बेकायदेशीररीत्या रिसॉर्टचे बांधकाम सुरू आहे.

### अर्जदाराचे मुख्य आरोप :

**परवानग्यांचा गैरवापर :**

सुरुवातीला ५० बंगल्यांच्या बांधकामासाठी परवानगी घेण्यात आली होती, मात्र प्रत्यक्षात त्या जागेवर एका आलिशान रिसॉर्टचे बांधकाम केले जात आहे.

नॅशनल बोर्ड फॉर वाईल्डलाईफच्या परवानगीची टाळाटाळ प्रकल्पाचे क्षेत्रफळ २०,००० चौ.मी. पेक्षा जास्त होत असतानाही, नॅशनल बोर्ड फॉर वाईल्डलाईफ आणि राज्य पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरणाची आवश्यक परवानगी घेतलेली नाही.

**नियमांचे उल्लंघनः**

पर्यावरण मंत्रालयाच्या २०१६ च्या अधिसूचनेनुसार, राष्ट्रीय उद्यानाच्या १ किमी परिघात नवीन व्यावसायिक हॉटेल्स किंवा रिसॉर्ट्स बांधण्यास बंदी आहे, तरीही हे बांधकाम सुरू असल्याचा दावा अर्जात केला आहे.



**एनजीटीचा आदेश :**

या प्रकरणाची सुनावणी न्यायाधीश दिनेश कुमार सिंह आणि तज्ज्ञ सदस्य डॉ. सुजित कुमार वाजपेयी यांच्या खंडपीठासमोर झाली. अर्जदाराचा युक्तिवाद ग्राह्य धरून कोर्टाने हा अर्ज सुनावणीसाठी ॲडमिट करून घेतला आहे. प्रतिवादी प्रताप सरनाईक, पर्यावरण मंत्रालय, प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना नोटीस बजावून त्यांचे स्पष्टीकरण मागवले आहे. अर्जदाराला बेकायदेशीर बांधकामे पाडण्याचे आणि पर्यावरणीय नुकसान भरपाई वसूल करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी अर्जात करण्यात आली आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी १२ फेब्रुवारी रोजी होणार असून, तोपर्यंत सर्व प्रतिवादींना आपली बाजू मांडायची आहे. या आदेशामुळे पर्यावरणप्रेमींचे लक्ष आत्ता या प्रकल्पाकडे लागले आहे.

# रक्तरंजित राजकारणाच्या काळात गांधींचा विचार मांडणे ही बंडखोरीच आहे!

एक जबाबदार नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून 'गांधीहत्या व आपण' या परिसंवादाकडे मी केवळ एका कार्यक्रमाच्या रूपात पाहत नाही. आज महाराष्ट्रात आणि देशात वाढत चाललेल्या हिंसक, द्वेषपूर्ण आणि असहिष्णु राजकारणाच्या पार्श्वभूमीवर हा परिसंवाद एक आवश्यक वैचारिक हस्तक्षेप आहे.

'धर्मराज्य पक्षा'चे संस्थापकीय अध्यक्ष राजन राजे यांनी आयोजित केलेला हा परिसंवाद समाजाला आत्मपरीक्षण करायला भाग पाडतो. गांधीहत्या ही फक्त भूतकाळातील घटना नसून, आजही समाजात जिवंत असलेल्या द्वेष, कट्टरता आणि असहिष्णुतेच्या विचारसरणीचे ती टोकाचे प्रतीक आहे. आज रस्त्यावर, राजकारणात आणि सार्वजनिक जीवनात जे रक्तरंजित वास्तव दिसते, त्याची मुळे याच विचारधारांमध्ये दडलेली आहेत.

अशा परिस्थितीत गांधींचे शांती, अहिंसा, सत्य आणि सहिष्णुतेचे विचार पुन्हा समाजात पेरणे ही केवळ वैचारिक जबाबदारी नाही; तर, लोकशाही टिकवण्यासाठीची नागरिकांची गरज आहे. या परिसंवादातून केवळ भाषणे झाली नाहीत; तर, आजच्या राजकीय आणि सामाजिक वास्तवावर प्रश्न उपस्थित करण्यात आले. नागरिक म्हणून आपण कोणत्या दिशेने चाललो आहोत, आणि ही दिशा आपल्याला कुठे घेऊन जाणार आहे, यावर गंभीर चिंतन घडवून आणले गेले. सामाजिक कार्यकर्ता म्हणून मी ठामपणे सांगू इच्छितो की, अशा प्रकारचे वैचारिक मंच हे लोकशाहीचे संरक्षण करणारे असतात. ते संवाद घडवतात, विवेक जागवतात आणि समाजात शांती व सलोख्याची बीजे पेरतात. आज जेव्हा हिंसा, भीती आणि द्वेष हे राजकारणाचे साधन बनत आहे, तेव्हा गांधींच्या विचारांची आठवण करून देणारे असे परिसंवाद हे प्रतिकाराचे आणि आशेचे स्वर ठरतात.

*- रत्नदीप कांबळे*

# पुन्हा एकदा निवडणूक मोसमाच्या निमित्ताने...

कोणती बांधिलकी अधिक टिकाऊ, चिवट? ''विचारातून'' आलेली; की, ''स्वतः सोसलेल्या वेदनेतून'' आलेली? ''त्यांनी'' वैचारिक बांधिलकी मानावी, अशी कधीच अपेक्षा नव्हती... कारण, ती ऑप्शनल असते; पण, त्यांनी आपल्या जन्मापासून, लहानपणी ज्या वेदना भोगल्या, त्याच्याशी बांधिलकी न ठेवण्याचा गुन्हा केला आहे!

**प्रौढ मतदानावर आधारित, राजकीय लोकशाहीत अनुस्यूत काय आहे?**

तर, मतदारांच्या हालअपेष्टा, त्यांच्या वेदना, त्यांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींमार्फत शासनापर्यंत पोहोचतील, ते लोकप्रतिनिधी आपल्या कायदे, आर्थिक धोरणे बनवण्याच्या विशेषाधिकाराचा वापर करत, शासनाची विविध धोरणे, अर्थसंकल्पीय तरतुदी, हे ते ज्या जनसमूहांचे प्रतिनिधत्व करतात, त्या जनसमूहांच्या प्रश्नांची धार बोथट करतील आणि दीर्घकाळात त्या प्रश्नांवर कायमचा इलाज करतील... बरोबर ?

जनप्रतिनिधी स्वतः उच्च जातीत, उच्चवर्गात जन्मला असेल...

तर, त्याला मानवी हालअपेष्टा म्हणजे नक्की काय? आतडी पिळवटणे म्हणजे काय? भुकेला रहाणे म्हणजे काय? इच्छा असूनही शिक्षण घेता न येणे म्हणजे काय? आपला रक्ताचा कोणी पैसे नाहीत म्हणून, औषध-शस्त्रक्रियेविना तडफडून मरणे म्हणजे काय? याची दाहकता, धग माहीतच नसेल; तर, त्यांच्याकडून मानवकेंद्रीपणाच्या अपेक्षा नाही बाळगता येणार... बरोबर?



पण, ज्या व्यक्तींनी हे सगळे स्वतः भोगले आहे, बहुसंख्य ग्रामीण भागातून, शेतीशी निगडीत कुटुंबातून, अनेकजण ग्रामीण/शहरी भागातील मालमत्ताहीन कुटुंबातून, लहानपणापासून प्रौढ होईपर्यंत आपल्या आजूबाजूला, आपले रक्ताचे नातेवाईक, आपले गाववाले, शेजारी-पाजारी यांना उघड्या डोळ्यांनी बघितले आहे. त्यातील अनेकांनी सामाजिक/धार्मिक अवहेलना सहन केली आहे, जवळून बघितलीही असेल.

त्या नगरसेवक, पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा, विधान परिषद, महामंडळे, लोकसभा, राज्यसभा, मंत्रीपदे आणि शासनातील, नोकरशाहीतील, न्याय-व्यवस्थेतील, कायदा व सुव्यवस्था यंत्रणांमधील अनेक पदांवर असणाऱ्यांनी, ज्या पदावरून त्यांना शासकीय धोरणे, अर्थसंकल्पिय तरतुदी, यावर प्रभाव पाडण्याचा कायदेशीर अधिकार प्राप्त होतो. त्या व्यक्ती पिण्याचे पाणी, परवडणारी घरे, सार्वजनिक वाहतूक, शाळा, आरोग्य, रोजगार निर्मिती, कामगार-कायदे अशा कोणत्याही क्षेत्रातील आर्थिक धोरणे, जी कोट्यवधी सामान्य नागरिकांच्या हिताची करायला नकार देतात (ते सार्वजनिक व्यासपीठांवर काय बोलतात, काय भाषणे, घोषणा देतात हे दुय्यम आहे.)

**प्रस्थापित व्यवस्थेला डाव्या/जनकेंद्री विचारधारा/आयडियॉलॉजी यांच्याशी वैचारिक बांधिलकी मानणाऱ्यांपासून धोका माहित असतो; म्हणून, ती व्यवस्था त्यांना देशद्रोही म्हणून जाहीर करते; पण, अशा व्यक्ती आहेत किती मूठभर... प्रस्थापित व्यवस्था निवांत असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, वंचितावस्थेतून येऊन जनप्रतिनिधी बनणारे, त्यांच्या वेदनांशी बांधिलकी बाळगणार नाहीत, याची व्यवस्थेला पूर्ण खात्री असते. माणसे प्रौढ झाल्यावर आधीच्या आयुष्यातील स्वतः सोसलेल्या रक्तबंबाळ वेदना विसरतात, ही मोठी मानवी शोकांतिका आहेच...** पण, पुढच्या पिढ्यांना कमीतकमी वेदना भोगाव्या लागाव्यात म्हणून चाललेल्या सामुदायिक प्रयत्नांत, प्रस्थापित व्यवस्थेच्या आतून जी काही अंशतः साथ मिळण्याची जी धूसर शक्यता असते, ती त्यामुळे उध्वस्त होते.

*....संजीव चांदोरकर*

# साखर कारखान्यांची आकडेवारी सांगतेय काय?

## महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणातील निर्णायक बदल

राजकीय अर्थव्यवस्थेतील संचित आकडेवारी, अनेक दशकांचा इतिहास सांगत असते... कारण, हे काही एक/दोन वर्षांत घडलेले नसते. स्वातंत्र्यानंतर अनेक दशके महाराष्ट्राच्या, विशेषतः पश्चिम महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय इतिहासात सहकारी साखर कारखाने केंद्रस्थानी होते.

आज महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची आकडेवारी...

(संदर्भ : ग्रोवन, १५ जानेवारी-२०२६)

एकूण साखर कारखाने : २८२

बंद कारखाने : ७९

चालू कारखाने : २०३

बहुराज्यीय कारखाने : १३

सहकारी साखर कारखाने : १०५

खाजगी साखर कारखाने : ११०

अवसायानात निघालेले कारखाने : ५४

खाजगी साखर कारखान्यांची संख्या, अलीकडेच सहकारी साखर कारखान्यांपेक्षा जास्त झाली आहे. याचे खूप दूरगामी परिणाम, ग्रामीण महाराष्ट्र/पश्चिम महाराष्ट्रात आणि एकूणच महाराष्ट्राच्या सामाजिक राजकीय फ्रेमवर होत आहेत, ते भविष्यात अधिक खोल जातील !!!

*....संजीव चांदोरकर*



# कैसा हराया..?

सहर शेखच्या या वाक्यानंतर MIM, मुस्लिम आणि धार्मिक ध्रुवीकरण वगैरे अनेक बाबींवर चर्चा सुरु आहे. नेहमीप्रमाणे इथल्या मीडियाने या दोन शब्दांना धरुन हिंदू-मुस्लिम सुरु केले आहे. विलास बडेसारख्या कारकुनी लोकांना, यात बडे मुद्देसारखे विषय दिसत आहेत. भाजपा खढ सेलला अत्यंत आवडीचा आणि त्यांच्या कामाचा विषय मिळाला आहे. एकंदरीत चखच कडून निवडून आलेल्या सहरमुळे हिंदू-मुस्लिम या मुद्द्यावर आपलं पोट भरणाऱ्या, आपली व्होट-बँक सिक्युअर करणाऱ्या दोन्हीकडील कट्टरवाद्यांना ते सर्वकाही मिळालं आहे. त्याची गरज त्यांना त्यांचे अजेंडे आणि त्यांचे केडर चालवण्यासाठी गरजेचे आहे. पण, यातून एक अत्यंत गंभीर आणि घातक गोष्ट मात्र घडते आहे. गाव-खेड्यातील मुस्लिम समाजातील सर्वसामान्य लोकांकडे, आता इतर समाजातील लोक वेगळ्या नजरेने बघणार आहेत, बघत आहेत आणि याचा त्रास, या सर्व राजकारणाशी काहीही देणंघेणं नसणाऱ्या मुस्लिम समाजातील लोकांना भोगावा लागणार आहे. सहरच्या एका वाक्याने, इथल्या मुस्लिम समाजाला कोणत्या परिस्थितीत आणून ठेवले आहे, याची जाणीव त्या पोरीला नसणार, हे मी खात्रीने सांगू शकतो... पण, त्याचवेळी हेदेखील नमूद करु इच्छितो की, ''कैसा हाराया..?'' हे तिचं वाक्य, फक्त जितेंद्र आव्हाडांसाठी होतं, बाकी इतर कोणताही हेतू त्यामागे नव्हता; पण, इथली माध्यमं या सगळ्याचा कसा वापर करु शकतात, याची जाणीव, समज आणि अक्कल त्या पोरीत नाही, तिच्या बापात नाही हे आम्हाला पक्के माहिती आहे. हे दोघे फक्त आपल्या विजयाचा आनंद साजरा करताना, उन्मादात मस्ती करुन गेले आहेत आणि त्याचे परिणाम मात्र, आता गाव-खेड्यातील मुस्लिमांना भोगावे लागणार आहेत.

तुम्हाला हा विषय पूर्ण समजून घ्यायचा असेल; तर, आपल्याला मुळात प्रकरण काय घडलं आणि त्याची पार्श्वभूमी काय आहे हे समजून घेणे गरजेचे आहे. सहर शेख आणि तिचे वडील युनूस शेख हे, जितेंद्र आव्हाडांचे कार्यकर्ते. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी, त्यांच्यासोबत काम केलेले आहे. या विधानसभा निवडणुकीतदेखील ते राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाच्या सोबत होते. माझ्या माहितीनुसार, सहर हिची आई कोकणी आणि वडील हे यूपीचे आहेत. घरात अत्यंत धार्मिक वातावरण... अर्थात, हा त्यांचा चॉईस आहे आणि त्याबद्दल कोणाला आक्षेप असायचं कारण नाही. तर, या महापालिका निवडणुकीत सहरला राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाकडून तिकीट हवे होते, त्यासाठी ती उमेदवारी अर्ज दाखल करायच्या एक दिवस आधीपर्यंत तिच्या वडिलांच्या सोबत प्रयत्न करत होती. परंतु, तिला उमेदवारी मिळाली नाही. परिणामी, उमेदवारी अर्ज दाखल करायच्या अंतिम दिवशी ती MIM पक्षात दाखल झाली. इथपर्यंत सगळे ठीक होते. नंतर तिच्या वडिलांनी, जितेंद्र आव्हाडांवर चिखलफेक करायला सुरुवात केली आणि संविधानिक भाषा बाजूला ठेवून त्यांनी प्रचंड प्रक्षोभक आणि चिथावणीखोर भाषा वापरत, आव्हाडांविरोधात दंड थोपटले... आणि, पुढचं महत्त्वाचं म्हणजे, यामुळे इथल्या मुस्लिम समाजातील लोकांना, जे कट्टर मानसिकतेचे आहेत, त्यांना एक नेता जन्माला आल्याचा साक्षात्कार झाला. आता हा साक्षात्कार, ज्या लोकांना झाला ती लोकं कोण होती? तर ती, लोक आहेत, यूपी-बिहारी भैय्ये मुसलमान... ज्यांना या राज्यातील मुस्लिमांची राजकीय गणितं माहित नाहीत, ज्यांना इथली सांस्कृतिक गणितं माहित नाहीत, ज्यांना एकोपा नावाचा प्रकार माहित नाही. ही सगळी लोकं, मुंब्रासारख्या मुस्लिमबहुल भागात एकत्रितपणे राहतात. हा मुस्लिम 'Ghetto' आहे. इथं आपण काहीही बोललो तरी, आपलं काहीही वाकडं होणार नाही, हा विश्वास या लोकांना आहे. त्यांना मराठी-मुसलमान या संकल्पनेबद्दल माहिती नाही आणि माहिती असली तरी, या लोकांकडे हा वर्ग ''तुच्छ'' या नजरेने बघतो. शिव-शाहू-फुले आणि आंबेडकरांकडे झुकलेला इथला मराठी-मुसलमान, त्यांना कधीच पटलेला नाही. इथला मराठी मुसलमान, अफझलखानाला या मातीचा शत्रू मानतो, ही बाब या भैय्या मुस्लिमांना प्रचंड खुपते. तर, अशा भैय्या मुसलमानांना, युनूस शेखमध्ये एक नेता दिसला. आपल्या मुस्लिमबहुल भागाचा नेता, एक हिंदू कसा असू शकतो? अशी चीड असणाऱ्या वर्गात आपोआप एक आशेचा किरण निर्माण झाला आणि त्यांनी भरभरुन मतांचं दान युनूस शेख आणि त्यांच्या पक्षाच्या पारड्यात टाकलं आणि सहर शेख तिच्या इतर सहकाऱ्यांच्या समवेत अख्खं पॅनल घेऊन निवडून आली.




**आत्मविश्वास शिगेला पोहोचला आणि त्यातून युनूस शेखने विजयी सभेतदेखील आव्हाडांना ललकारलं, आव्हान दिलं. पोरीने त्यावर कडी करत, ''कैसा हराया?'' हा डायलॉग मारला. महाराष्ट्राच्या मातीचं सांस्कृतिक गणित न समजणाऱ्या लोकांनी असंच वागणं अपेक्षित आहे. याची समज आपल्या इथल्या मुस्लिमांना मोठ्या प्रमाणात आहे; पण, बाहेरुन येऊन (विशेषतः उत्तर प्रदेश, बिहार) इथं प्रस्थापित झालेल्या मुस्लिमांना याबद्दल काहीच माहित नाही आणि माहित असलं तरी, त्याच्याशी त्यांना काहीही देणंघेणं नाही.**

मात्र, यानंतर त्यांच्यात एक उन्माद घुसला. आत्मविश्वास शिगेला पोहोचला आणि त्यातून युनूस शेखने विजयी सभेतदेखील आव्हाडांना ललकारलं, आव्हान दिलं. पोरीने त्यावर कडी करत, ''कैसा हराया?'' हा डायलॉग मारला. महाराष्ट्राच्या मातीचं सांस्कृतिक गणित न समजणाऱ्या लोकांनी असंच वागणं अपेक्षित आहे. याची समज आपल्या इथल्या मुस्लिमांना मोठ्या प्रमाणात आहे; पण, बाहेरुन येऊन (विशेषतः उत्तर प्रदेश, बिहार) इथं प्रस्थापित झालेल्या मुस्लिमांना याबद्दल काहीच माहित नाही आणि माहित असलं तरी, त्याच्याशी त्यांना काहीही देणंघेणं नाही. कारण, त्यांना फक्त मुंब्रासारख्या बहुसंख्य मुस्लिम असणाऱ्या लोकवस्तीच्या ठिकाणीच राहायचं आहे. इथंच आपलं आयुष्य व्यतीत करायचं आहे. आपण काय बोलतो, काय वागतो, त्याचे काय परिणाम होतात? याचा ते विचार करत नाहीत. किंबहुना त्यांची तितकी कुवत नाही. मुस्लिमबहुल भागात राहुन आपला कार्यभाग साधायचा, इतकंच या लोकांना माहित आहे. या मातीतला मराठी-मुस्लिम हा, कायम ''महाराष्ट्रधर्म'' पाळत आलाय. एकोपा जपत आलाय... पण, आता याला सुरुंग लावण्याचं काम यूपी-बिहारचे मुस्लिम समाजातील काही लोक करत आहेत आणि त्याचा फटका गावखेड्यातील मुस्लिमांना मोठ्या प्रमाणावर बसणार आहे. माध्यमं काय, TRPच्या नावाखाली हा कलगीतुरा नाचवत राहतील. दोन्हीकडील कट्टरवादी याचा मोठ्याप्रमाणात वापर करुन घेतील; पण, या सगळ्यात या मातीच्या मूळ गुणधर्मांना धक्का लागू नये, याची काळजी आता, 'सर्वधर्मसमभाव' जपणाऱ्या सर्वच समाजातील लोकांनी घेणे गरजेचे आहे... विशेषतः मुस्लिम बांधवांनी... कारण, इथं आपला ''महाराष्ट्रधर्म'' धोक्यात आहे !!!

*...मोहसीन शेख*

## अतिशय गंभीर चिंतनीय पोस्ट...

# "मला फक्त मज्जा हवीये" (Todays Goal of Every Youth)

तुमच्या आयुष्याचं उद्दिष्ट काय आहे?

प्राचीन काळी ''ज्ञानप्राप्ती आणि परमार्थसाधना'' हे उदात्त उत्तर मिळत असे. अर्वाचीन काळी ''प्रापंचिक सुख'' हे, व्यवहारात बसेल इतपत उत्तर देत असे. आत्ता काल-परवा ''पैसा, समाधान, शांती'' हे शब्द ऐकू यायचे. हल्ली थेट विकेट पडते... ''मला फक्त मज्जा करायचीय! विषय संपला...

**''मज्जा केलीच पाहिजे'' ही बळजबरी, माणसं एकमेकांच्या उरावर पांघरु लागलीयेत. इथे ''मज्जा'' ही निवडीची गोष्ट राहीली नाहीये; तर, ती ''निकड'' झालीय, केली गेलीय. मज्जा कशी करायची? हे निवडण्याचंही स्वातंत्र्य नाही, ती समाजातल्या ''मॉडर्न'' शहाण्यांनी (!) आखून दिलेल्या पद्धतीनेच व्हायला हवी. तशी ती नाही केली म्हणजे, ''फालतू आहात तुम्ही!'' हे तुमच्या तोंडावर फेकून मारलं जातंय, म्हणजे पहा!**

''बर्थ-डे सेलिब्रेशन घरात? शी...''

''पार्टी नाही? शी...''

''फ्रायडे नाईट, आणि तू घरी आहेस?

''शी... पथेटिक...''

तुम्ही घरी स्वयंपाक वगैरे करुन खाता विकेंडला? फारच बोरिंग...

''तू आजवर कधी पबमध्ये गेलीच नाहीस? काय काकूबाई आहेस गं...''

''वॅलेन्टाईन डे आणि नो रोजेस? शी, बोअर...''

''डेटवर चाललायस? आणि, हातात नो गिफ्ट्स? डे डरव...''

''वीकेन्ड घरच्यांबरोबर? नो फ्रेन्ड्स? नो आऊटिंग? शी...''

यात नफ्याची आर्थिक गणितं ठासून भरलेली आहेत. नव्वदच्या दशकात ग्लोबलायजेशन आपल्यावर येऊन आदळलं आणि त्या नव-श्रीमंतीच्या लाटेवर अनेकजणांनी विचार/विवेक गहाण टाकले. तसे त्यांनी ते टाकावेत, जास्तीत जास्त मासे या भोगवादात सापडावेत, यासाठी (त्यातल्या त्यात पाश्चात्य) कॉर्पोरेट कंपन्यांनी मार्केटिंगची जाळी मस्तपैकी सर्वदूर फेकली होतीच. टीव्ही-सिनेमा, सततच्या जाहिरातींच्या भडिमाराने, आमचा सुरेख ब्रेनवॉश केला गेला. न्युरोलिंग्विस्टिक प्रोग्रामिंग तंत्राच्या वापराने, ध्वनी व दृश्य या दोघांनी, आमचे कान आणि डोळे स्वप्नांत गुंतवले. मध्यमवर्गीय काटकसरीने म्हातारपणाच्या चिंता सोडून ''आजचं बघा'' हा अमेरिकन मंत्र स्विकारला. मग, अचानक वाढदिवसाला निरांजनांच्या ओवाळणी इरलज्जुरीव झाल्या... वीस-पंचवीस हजारांचं हॉटेलवालं सेलिब्रेशन रितीचं झालं.

'सीसीडी' अन् 'बरिस्ता'मधल्या दोनशे रुपयांच्या कॉफ्या आम्हाला स्वस्त वाटू लागल्या. 'अनलिमिटेड बुफे'च्या नावाखाली, बार्बेक्यूंच्या भट्टीत पगार जाळून घेणं, हे ''त्यात काय एवढं?'' असं झालं. पाचशेच्या जीन्स, पाचहजार झाल्या. पूर्वी कोण कुत्रंही ज्या कॉटनला विचारत नव्हतं, तेच कॉटन 'लिनन'च्या रुपात, थेट स्टेटस-सिम्बॉल बनलं. एक

**झुंडीत सामील झाल्यावर आपण किती 'COOL'' आहोत, याच्या देखाव्यांचं एक Compulsion असतं ना... त्यात बऱ्याचजणांचा श्वास कोंडला जातो. तो देखावा न करणाऱ्यांना पाखंडी समजून झुंडीबाहेर फेकलं जातं. मुळात जे झुंडीत कधी सामील झालेच नाहीत, किंवा आर्थिक कारणांमुळे होऊ शकले नाहीत, त्यांच्याकडे आगाऊपणाने ''सो पथेटिक'' म्हणून नकारात्मकतेने पाहिलं जातं, त्यांच्या मनात स्वत:बद्दल न्यूनगंड निर्माण होईल याचे पद्धतशीर प्रयत्न सुरु होतात.**

**असा. विषय इतपत येऊन थांबलेला नाही. दारु नि सिगरेटचं उदात्तीकरण तर, आता जुनं झालं. आता त्याच्यापुढे सर्वसामान्य मराठी मध्यमवर्गीय पोरांच्या तोंडीही ''वीड'', ''ग्रास'' हे शब्द येऊ लागलेत. यांचे अर्थ माहितीयेत? गांजासारख्या भयानक नशील्या पदार्थांची अमेरिकेतून उचललेली बोली भाषेतली नावं आहेत ही. या घाणीची जाहिरात थेट करता येत नाही; पण, त्यासाठी आमचे नव्याने पैदास झालेले ''रॉकस्टार्स'' आणि 'Rap Singers'' आहेत ना...** त्यांच्या गाण्यांतून या अमली विकृतीची भलावण रोजच्या रोज होतेय. ''मनाली ट्रान्स'' म्हणे. शोधा गुगलवर लिरिक्स. शब्दांना जोड दृश्यांची, दृश्यांत ठासून भरलेला सेक्स. अनिर्बंध-अमर्याद आणि मुद्दाम चाळवणाऱ्या अनैतिक नात्यांचा, अगदी घरच्या अंतर्गत नात्यातही तो मुक्तहस्ते सपोर्ट करणारा. एकेक वेबसिरिज मनोरंजन कमी आणि पोर्नो



दिवसाचं मराठी लग्न पाच दिवसांचं 'Big Fat Punjabi Wedding'' झालं, घराच्या हॉलमधले साखरपुडे नि टिळे हे, फाईव-स्टारवाले ''इवेन्ट्स'' झाले. मज्जा, आनंद, आपल्या आत निर्माण करायचा असतो म्हणताय? तुमची संस्कृती तसं सांगते? हड... चुलीत घाला तुमची संस्कृती. आमचं 'Grand Live Life King size' उधळणं घ्या. बायकोला सोन्या-चांदीतून बाहेर काढा, हिरे नि प्लॅटिनममध्ये तिला बुडवून काढा. तुमच्या पोराला गर्लफ्रेन्ड नि पोरीला बॉयफ्रेन्ड असलाच पाहीजे. त्यांच्या ''प्रेमाचं'' मूल्यमापन गिफ्टच्या किमतीवर ठरेल... कमवा आणि उडवा!

**तुम्ही तुमच्या नवाबजाद्यांकडे पहा बघू... डर्लींश चरलहे !! भले तुम्ही स्टायपेन्डवाले ट्रेनी इंजिनिअर** ग्राफी जास्त, इतपत मज्जेच्या डेफिनेशन्स गेलेल्या. तरुणांना नाद लावायला तेवढं पुरतं!

**चील... एन्जॉय... पार्टी चलेगी टिल सिक्स इन द मॉर्निंग... मग मेलात तरी चालेल... आपण ठरवलेलं उद्दिष्ट हे, प्रत्यक्षात आपण स्वत: निवडलेलं नसून, ते आपल्याला गंडवून आपल्याकडून निवडून घेतलं गेलंय, हे लक्षात येतंय आपल्या? चंगळवाद हा एक कॉर्पोरेटधार्जिणा पंथ झालाय. पंथामध्ये विचार आणि आचार निवडीचं स्वातंत्र्य नसतं. कुणीतरी महाभागाने सांगितलेलं तत्वज्ञान तो महापुरुष आहे, असं सगळे म्हणतात म्हणून, मुकाट्याने नाकासमोर धरुन चालणं, हे पंथाचं आचारशास्त्र असतं.** ...पृष्ठ क्र. ७ वर

# डार्क वेब आणि त्याचे धोके: एक अभ्यास

इंटरनेट हे माहितीचे विस्तीर्ण आणि गुंतागुंतीचे जाळे आहे. त्यातील मोठा भाग Google आणि Bing सारख्या पारंपरिक शोधयंत्रांद्वारे सहज उपलब्ध असतो. मात्र, इंटरनेटचा एक भाग असा आहे जो सर्वसामान्य नजरेपासून लपलेला आहेयालाच 'डार्क वेब' म्हणतात. आपण रोज वापरत असलेल्या इंटरनेटला अनेकदा 'सामान्य' किंवा 'रेग्युलर' इंटरनेट असेही म्हटले जाते. विविध अंदाज मांडले जात असले तरी, नेमकी आकडेवारी कोणालाही ठामपणे सांगता येत नाही, कारण या जगात सर्वकाही प्रचंड गुप्त आणि अज्ञात असते. विशेष म्हणजे, वेबचा सर्वात छोटा भागच बहुतेक वेळा सर्वाधिक लोकप्रिय आणि सहज उपलब्ध असतो.

डार्क वेब हा इंटरनेटचा असा घटक आहे जो पारंपरिक शोधयंत्रांमध्ये सूचीबद्ध नसतो आणि ज्यामध्ये प्रवेश करण्यासाठी विशेष सॉफ्टवेअरची गरज असते. येथे अनेक बेकायदेशीर क्रिया घडतात आणि ऑनलाइन जगातील काही अतिशय धोकादायक घटक याच ठिकाणी आढळतात.

डार्क वेब ही संकेतस्थळांची एक गुप्त साखळी आहे, ज्यात प्रवेश करण्यासाठी विशेष वेब ब्राउझर आवश्यक असतो. ऑनलाइन क्रियाकलापांची गोपनीयता आणि अज्ञातता राखण्यासाठी याचा वापर केला जातो, जो कायदेशीर तसेच बेकायदेशीर अशा दोन्ही हेतूंसाठी होऊ शकतो. काही लोक सरकारी सेन्सॉरशिपपासून बचाव करण्यासाठी याचा वापर करतात, तरीही संभाव्य गुन्हेगारी क्रियांसाठी त्याची उपलब्धता असल्याचे अनेकदा नोंदवले गेले आहे.

## डार्क वेब म्हणजे काय?

डार्क वेब हा इंटरनेटचा असा भाग आहे ज्यामध्ये फक्त विशिष्ट सॉफ्टवेअरद्वारेच प्रवेश करता येतो उदा. Tor (The Onion Router), I2P (Invisible Internet Project) आणि Freenet. ही साधने वापरकर्त्यांना लपवलेली संकेतस्थळे पाहण्यास आणि एकमेकांशी अज्ञातपणे संवाद साधण्यास सक्षम करतात.

डार्क वेबचा अनेकदा अंमली पदार्थांची तस्करी, शस्त्रांची खरेदी-विक्री आणि मानव तस्करी यांसारख्या निषिद्ध क्रियाकलापांशी संबंध जोडला जातो. हे खरे आहे की डार्क वेबवर बेकायदेशीर क्रिया घडतात; मात्र, डार्क वेबवरील सर्व काही बेकायदेशीरच असते असे नाही. माहिती उघड करणारे (whistleblowers), सुरक्षित संवाद आणि संशोधन यांसारख्या वैध कारणांसाठीही डार्क वेबचा वापर केला जातो.

## डार्क वेब धोकादायक आहे का?

डार्क वेब काही वैध उद्देशांसाठी उपयुक्त ठरू शकतो; तथापि, त्यामध्ये असलेले अंतर्निहित धोके लक्षात घेणे अत्यावश्यक आहे. या प्लॅटफॉर्मशी संलग्न होण्यापूर्वी वापरकर्त्यांनी संभाव्य जोखमींबद्दल पूर्ण जाणीव ठेवली पाहिजे. प्रमुख धोके पुढीलप्रमाणे आहेत:

सायबर गुन्हेगारी: डार्क वेब हे सायबर गुन्हेगारांचे केंद्र आहे. ओळख चोरी, क्रेडिट कार्ड फसवणूक आणि मालवेअर प्रसार यांसारख्या बेकायदेशीर क्रिया येथे केल्या जातात.



अज्ञाततेमुळे हे गुन्हेगार कायदा अंमलबजावणी यंत्रणांपासून लपून राहू शकतात.

बेकायदेशीर क्रिया: अंमली पदार्थांची तस्करी, शस्त्र व्यापार आणि मानव तस्करी यांसारख्या गुन्हेगारी क्रियांचा डार्क वेबवर मोठ्या प्रमाणावर प्रसार आहे. अशा क्रियाकलापांमध्ये सहभागी झाल्यास खटला आणि कारावासाचा धोका असतो.

फसवणूक: अनेक डार्क वेब संकेतस्थळे वापरकर्त्यांची वैयक्तिक माहिती किंवा पैसा चोरण्यासाठीच तयार केलेली असतात. त्यामुळे सतर्क राहणे आणि अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे.

मालवेअर: डार्क वेबवर मालवेअरचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होतो, ज्यामुळे वापरकर्त्यांची उपकरणे संक्रमित होऊ शकतात आणि वैयक्तिक माहिती चोरीला जाऊ शकते.

डार्क वेब हे एक गुंतागुंतीचे आणि धोकादायक क्षेत्र आहे; त्यामुळे त्याकडे अत्यंत सावधगिरीने पाहणे आवश्यक आहे. जरी काही वैध उपयोग असले तरी, डार्क वेबवर प्रवेश करताना सायबर गुन्हेगारी, बेकायदेशीर क्रिया, फसवणूक आणि मालवेअर यांसारख्या गंभीर धोक्यांचा सामना करावा लागतो. म्हणूनच, डार्क वेब वापरताना काळजी घेणे, सतर्क राहणे आणि कोणतीही संशयास्पद कृती आढळल्यास तात्काळ कायदा अंमलबजावणी यंत्रणांना कळवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

## ''मला फक्त मज्जा हवीये'' ...पृष्ठ क्र. ६ वरुन

**तेच चंगळवादाचं आहे. ''आम्ही किती आनंदात आहोत'', ''आमचं किती मस्त चालू आहे'', ''आम्ही किती एन्जॉय करतोय'', हे दुसऱ्याला दाखवणं, हा चंगळवादाचा अट्टहास असतो. ते दुसऱ्याने सत्य म्हणून मान्य केलं; तर, चंगळवादाचा विजय असतो आणि आपण ओढवून घेतलेल्या पद्धतीचा दुसऱ्याने स्वीकार केला; तर, तो चंगळवादाचा दिग्विजय असतो.**

मुद्दा हा आहे की, या झुंडीत सामील झाल्यावर आपण किती 'COOL' आहोत, याच्या देखाव्यांचं एक Compulsion असतं ना... त्यात बऱ्याचजणांचा श्वास कोंडला जातो. तो देखावा न करणाऱ्यांना पाखंडी समजून झुंडीबाहेर फेकलं जातं. मुळात जे झुंडीत कधी सामील झालेच नाहीत, किंवा आर्थिक कारणांमुळे होऊ शकले नाहीत, त्यांच्याकडे आगाऊपणाने ''सो पथेटिक'' म्हणून नकारात्मकतेने पाहिलं जातं, त्यांच्या मनात स्वत:बद्दल न्यूनगंड निर्माण होईल याचे पद्धतशीर प्रयत्न सुरु होतात. गंमत म्हणजे, चंगळवादाचे पुरस्कारकर्ते व्यक्तिस्वातंत्र्याच्या गप्पा मारतात; पण, हीच सोंगं आयुष्य आनंदाने जगण्याचे प्रत्येकाचे स्वतंत्र वेगळे मार्ग असू शकतात, हे साधं सत्य दुसऱ्याला नाकारतात. त्यावेळी आपण त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच करतोय, हे यांच्या गावीही नसतं. म्हणूनच मग, ''तुम्ही दारु पिऊन पार्ट्या करत नाही; म्हणजे, आयुष्य कसं एन्जॉय करायचं ते तुम्हाला माहीतच नाही!'' अशी बिनडोक तर्कटं मांडली जातात, जी हास्यास्पद ठरतात. हेअर जेल, मेकअप आणि ब्रँडेड कपड्यातली बिनधास्त आहोत हे दाखवत राहण्याची केविलवाणी धडपड नजरेत लपत नसते. ब्रँडेड आयुष्यातल्या पोकळ्या वेडावतातच!

जागे होऊया रे... स्वत्व नको विकूया आपण. दुनियेतल्या प्रत्येकाला आपण आवडलोच पाहीजे, हा मूर्ख विचार सोडूया आणि करुया हिंमत, स्वत:चा स्वतंत्र जीवनभाव निवडण्याची. सेलिब्रेशन्स मिळकतीची होऊ देत आणि ती नजाकतीची होऊ देत. उधळण्याच्या फुलबाज्या क्षणभरच चमकतात, स्वतंत्र विवेकाचा सूर्य अनंतकाळ चमकतो... आपण सूर्य निवडू या !!!

*- समाजमाध्यमांतून साभार*

# राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या पुण्यतिथीनिमित्त, ठाण्यात 'हुतात्मा दिन' संपन्न!

...पृष्ठ क्र. १ वरुन

कधीही राष्ट्रध्वज स्विकारला नाही, त्यांचाच द्विराष्ट्रवादाला पाठिंबा होता आणि विनायक दामोदर सावरकर हे त्यांचे म्होरके होते. गांधीजी हे हिंदू–मुस्लिम ऐक्याचे एकमेव पुरस्कर्ते होते, अहिंसेचे पुजारी होते, अशा शब्दांत डॉ. विवेक कोरडे यांनी आपले परखड मत मांडले. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात कॉ. आनंद तेलतुंबडे यांनीदेखील आरएसएसच्या विचारांवर एकच प्रहार केला. सद्यस्थितीत भारतातील जी राजकीय व सामाजिकव्यवस्था ढासळलेली आहे, त्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षाची जातीयवादी विचारसरणीच कारणीभूत असल्याचे स्पष्ट करुन ते पुढे म्हणाले की, पुढील एकहजार वर्षे तरी भारतातून भाजपची सत्ता जाणार नाही, जोपर्यंत ते ठरवत नाहीत, असा अपप्रचार होत असला; तरी त्यात बिलकूल तथ्य नाही...आपण सारे एकत्र आलो आणि त्यांचं सगळं साम्राज्य, हे फक्त आणि फक्त, खोटारडेपणाच्याच पायावर उभारलेलं आहे, हे ध्यानात घेऊन त्यावर एकत्रित व सनदशीर मार्गाने प्रहार केला; तर, ते सहजशक्य आहे. आज त्यांनी सर्व शासकीय व प्रशासकीय व्यवस्था ताब्यात घेतलेल्या आहेत. राजन राजे यांच्यासारखी जी काही हाताच्या बोटावर काम करणारी मोजकी माणसं समाजात आहेत, त्यामुळेच भाजप–आरएसएससारख्या धर्मविद्वेशीशक्तींवर काही प्रमाणात का होईना, अंकुश आहे यातच समाधान असल्याचे प्रतिपादन कॉ. आनंद तेलतुंबडे यांनी यावेळी केले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, विद्रोही शाहीर संभाजी भगत यांनी खास उपस्थिती लावून आपल्या पहाडी आवाजात कविता सादर केळी. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॉ. शिरीष ढवळे यांनी केले तर, कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.




















हुतात्मा दिन
धर्मराज्य पक्ष, ठाणे काँग्रेस आणि
मूलभूत अधिकार संघर्ष समिती
गांधीहत्या आणि आपण
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

हुतात्मा दिन
गांधीहत्या
वक्ता


हुतात्मा दिन
वक्ता
डॉ. विवेक कोर्डे

"अशीच जावो
काही वर्षे,


# हिंदू विरुध्द हिंदू...

*(एका ‘जय महाराष्ट्र’ नावाच्या व्हॉट्सप-ग्रुपवर रोहित आर्य प्रकरणी डॉ. प्रशांत गंगावणे, यांचा संदेश वाचला; लागलीच, त्यावर मी, राजन राजे, स्वानुभवाने प्रेरित होऊन, हा संदेश पाठवला...मूळ डॉ. प्रशांत गंगावणेचा संदेश, माझ्या संदेशाखाली टाकलाय, धन्यवाद!)*

शीर्षकात हिंदू विरुद्ध हिंदूसोबतच... नोंदणीकृत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विरुद्ध ‘बिगर-नोंदणी’चा (व्यवहारतः, ‘बेकायदेशीर’) राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशी पुस्ती जोडायला पाहिजे होती!

व्यक्तिशः माझ्या ४ दशकांहून अधिककाळचं जगण्यातलं सर्वात महत्त्वाचं ‘कार्यक्षेत्र’ (विशेषतः, मराठी-जगण्यातलं) म्हणजे, कामगार-क्षेत्रात आलेला दाहक अनुभव सांगतो की, हिंदूच अत्यंत पद्धतशीपणे व नृशंसपणे हिंदुंना लुटतात... पण, अनेकदा ‘मुस्लीम’ असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांनी, कंपन्यांचे सल्लागार अथवा व्यवस्थापक असलेल्यांनी... हिंदू कामगारांचं चांगभलं करण्यासाठी, अंतःप्रेरणेनं आपली ‘कॉर्पोरेटीय-कारकीर्द’ (Corporate Career) प्रसंगी धोक्यात टाकून (व्यवस्थापकीय परिभाषेत Out Of Way जाऊन) कामगार-कर्मचारीवर्गाला मोठी व निर्णायक मदत केलेली आहे... व त्यासाठी, अशा खऱ्याखुऱ्या अर्थाने ‘धार्मिक-आध्यात्मिक’ असलेल्या महान व्यक्तित्वांप्रति आम्ही कृतज्ञ आहोत; तसंच, समस्त तळागाळातील पिडीत-शोषितवर्गाने अशा माणुसकीने भारलेल्या मंडळींप्रति कायमच कृतज्ञ व ऋणी राहिलं पाहिजे...आणि मुख्य म्हणजे, त्यांनी अशी खरीखुरी ‘धार्मिक-आध्यात्मिक’ माणसं ओळखायला शिकलं पाहिजे, मग तो कुठल्याही जातधर्माचा असो! लक्षात ठेवा, केवळ, कुठल्या धर्मग्रंथाचं सतत पठण, पूजापाठ करुन अथवा प्रार्थनास्थळी वा धर्मसंप्रदायात वारंवार जाऊन, देवदर्शन करुन किंवा भाळी-कपाळी लालभडक ‘टिळे’ लावून...कुणीही यःकिंचितही तसं, ‘धार्मिक-आध्यात्मिक’ कधी बनत नाही...तर, स्वतःच्या अंतःकरणातल्या ‘प्रज्ञा आणि करुणे’ला जागवूनच तो तसा बनू शकतो...!!!

*(डॉ. प्रशांत गंगावणे यांचा मूळ लेख....)*

---

रोहित आर्य नावाचा हिंदू कॉन्ट्रॅक्टर, शिक्षण विभागाचा एक प्रोजेक्ट व्याजाने पैसे काढून घेतो. पूर्ण करतो...शिक्षण विभागातले हिंदू वरिष्ठ त्याचे पेमेंट दाबून ठेवतात...बिलच काढत नाही...का; तर, आधी ‘लाच’ कोण देणार...बिलाचं नंतरचड

तो हिंदु ३ वर्षे व्याज भरुन बँकरप्ट होतो...सर्व प्रयत्न करतो; प्यूनसकट सगळ्यांना विनंती करत फिरतो...धक्के खातो!

हिंदू मंत्री दीपक केसरकर, हिंदू आयुक्त (ज्यांच्यावर कृषी खात्यातील बदल्यामध्ये १५० कोटींचा गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे) सूरज मांढरेला भेटतो. त्यांची डिमांडही कदाचित व्याजाच्याच पैश्यानं पूर्ण करतो ड पण, तरीही त्याची लागते....



हिंदुत्वाचे ठेकेदार हिंदू मतांवर निवडून येऊन एका हिंदू कॉन्ट्रक्टरलाच छळतात...

हिंदू कॉन्ट्रक्टर बिल पास होण्यासाठी आंदोलन-उपोषण करतो...हे म्हणतात मर तसाच, नाय काढत बिल जा!

मग तो रंग दे बसंती टाईप सिनेमा बघुन विचार करतो ; आता जेल तर जेल; पण बिल नाय निघालं तर फुटपाथवर झोपावं लागेल...

शेवटी पर्याय नसल्याने हिंदू कॉन्ट्रक्टर १७ हिंदू मुलांना बंधक बनवून काय मागतोय तर, त्याच्या कामाचं बिल.. बिल मिळाल्यावर त्या १७ गरीबांना प्रत्येकी १ - १ लाख रुपये द्यायचाही, तो कदाचित विचार करत असावा...नाहीतरी बँकेला फालतुमध्ये व्याज देण्यापेक्षा ह्या गरीबांना दिले तर काय वाईट आहेड

आता, दोन पर्याय हिंदुंच्या मतांवर निवडून आलेल्या सरकारकडं असतात....

१ त्याचे कष्टाचे पैसे त्याला देणे आणि १७ बंधकांना सहज सोडवणे

२ त्यापेक्षा, त्याचे पैसे न देता त्याला मनोरुग्ण जाहीर करुन, कुण्या वाघमारेला गोळी चालवून त्या कॉन्ट्रक्टरला मारण्याचे आदेश देणे

काय हिंदुंनो; तुम्ही निवडलेल्या सरकारने काय केले पाहिजे होते?

पवईत काय झाले?

रोहित आर्य, या कॉन्ट्रक्टरला भावपूर्ण श्रद्धांजली...

हिंदुंकडुन कष्टाचे पैसे मागितल्यानं बळी गेलास, तु हिंदू भावा!

आता पुढचे काही दिवस हिंदू मिडीयाच्या मदतीनं हिंदू कॉन्ट्रक्टर अतिरेक्याला कसं शूरवीर वाघमारेनं मारलंड याची वर्णनं, हिंदुंच्या कानावर पडतील...हिंदू मजा घेतील... चेकाळतील .

या सर्व प्रकारात एक प्रश्न तसाच राहील... रोहित आर्य, या हिंदू कॉन्ट्रक्टरचे कष्टाचे पैसे न देणारे सरकार आणि प्रशासनात बसलेले, ते हरामखोर हिंदू कोण?

मॅटर इज ओवर....

खरंतर ;

बहुसंख्य हिंदुंनी स्वतःहून मताचा अधिकार त्यागल्याशिवाय, या देशाला लोककल्याणकारी आणि जनताभिमुखी सरकारं मिळणार नाहीत...

***डॉ. प्रशांत गंगावणे***

---

## कामगार-धर्माची चार आर्य सत्ये....

१) ही भांडवली-व्यवस्था माझ्यासाठी काम करत नाही; तर, मी त्या व्यवस्थेसाठी काम करतो...केवळ, माझ्या टोकाच्या शोषणातूनच ती चालते व चालू शकते आणि हे दुष्टचक्र थांबवण्याची जबाबदारी माझीच आहे....

२) मी कामगार म्हणून ‘राष्ट्रीय-संपत्तीचा निर्माता’ आहे; पण, त्या निर्मीत-संपत्तीतून मी आज बेदखल आहे; कारण, माझ्या श्रमाची आणि रक्ताघामाची भांडवलदारांकडून राजरोस चोरी-दरोडेखोरी होतेय आणि ती चोरी-दरोडेखोरी थांबवण्याचा इलाज आहे....

३) ही लुटारु व्यवस्था, अशीच चालत रहावी... काँक्रिटचे अगणित इमले रोज सर्वत्र उभारले जात रहावे, खाजगी (कॉर्पोरेटीय) व सरकारी अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार, ऐय्याशी...अशीच अनिर्बंध चालू रहावी; म्हणूनच, मला मान मोडून ‘तुटपुंज्या पगारा’वर जबरदस्तीने काम करायला ‘भांडवली-व्यवस्था’ भाग पाडते....

४) माझ्या अस्थिर जीवनाचं व तुटपुंज्या पगाराचं ‘दुष्टचक्र’ थांबवायचं; तर, मलाच राजकारणात सक्रिय पुढकार घेऊन ‘कंत्राटी-कामगार पद्धत’ आणि ‘४ काळ्या कामगार-संहिता’ (Black Labour-Codes) या दोन्हींचा नायनाट करायला हवा.

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

# ठाकरे ७२–७३ वर पोहोचणं म्हणजे पराभव नाही, तो सत्ताधाऱ्यांना दिलेला इशारा आहे



मुंबईत भाजप-शिंदे गट ११६ जागांवर पोहोचला आहे.

पहिल्या नजरेला हा आकडा मोठा वाटतो.

पण थोडं थांबून, थंड डोक्याने आणि प्रामाणिकपणे पाहिलं, तर हा आकडा विजयाचा नाही, तर अस्वस्थतेचा आहे.

कारण एक गोष्ट विसरता कामा नये

ठाकरे गटाची ही लढाई पूर्णपणे शून्यापासून सुरू झाली होती.

चिन्ह चोरलं गेलं.

पक्ष फोडला गेला.

कार्यकर्ते फोडले गेले.

राज्य आणि केंद्र सरकारची संपूर्ण यंत्रणा वापरली गेली.

पैसा ओतला गेला.

दबाव टाकला गेला.

तरीही ठाकरे उभे राहिले.

आणि जनता त्यांच्या पाठीशी उभी राहिली.

या ७२/७३ जागांपैकी जवळपास ३५ नगरसेवक 'सेटिंग'मधून आलेले आहेत आणि उरलेले ३५ पूर्णपणे नवीन, ताजे, न झुकलेले चेहरे आहेत.

म्हणजे हा विजय कुठल्याही लोकलाटेविरोधात आलेला नाही,

तर सत्ताधाऱ्यांनी उभ्या केलेल्या अडथळ्यांवर मात करून मिळवलेला आहे.

दुसरीकडे पाहिलं तर

अमाप पैसा

केंद्र + राज्य सरकारची ताकद

चोरलेले कार्यकर्ते

बाहेरून आणलेले नेते

हे सगळं असूनही भाजपशिंदे गट ११६ च्या पुढे जाऊ शकला नाही.

हा विजय नाही.

हा सत्तेचा घाम आहे.

हा सत्तेच्या माजाला बसलेला धक्का आहे.

आणि म्हणूनच हे स्पष्ट आहे

म्हणजे ठाकरे यांचा हा विजय लोकलाटेचा आरसा आहे.

हा दबावाचा नाही,

हा पैशाचा नाही,

सौद्यांचा परिणाम नाही.

हा विजय आहे डोळ्यात पाणी असलेल्या सामान्य माणसाचा,

न झुकलेल्या शिवसैनिकाचा,

आणि आजही बाळासाहेबांचा आवाज ओळखणाऱ्या मुंबईचा.

इतकं सगळं करूनही

जर विजय निसटता असेल,

तर तो विजय नसतो

तो भविष्यासाठी दिलेला इशारा असतो.

म्हणूनच सांगावंसं वाटतं

हा पराभव ठाकरेंचा नाही.

हा पराभव सत्तेच्या अहंकाराचा आहे.

मुंबई अजूनही ठाकरे यांचीच आहे.

## महागाईचा भस्मसूर

महागाईचा भस्मसूर आज
सामान्य जनतेला गिळत सुटलाय
सामान्य जनतेचं कंबरडं मोडून
अक्षरशः सामान्यांच्या जीवावर उठलाय...१
शेतकरी दुष्काळाने ग्रास्त आहे
मरताही येत नि धड जगताही येत नाही
मरण त्याचं जिवापेक्षा स्वस्त आहे
कारण महागाईचा भस्मसूर त्यांना
जगू देत नाही....२
कामगारांचेही तेच हाल
कुणीही नाही त्यांची ढाल
भांडवलदरांची आज चलती आहे
सारेच कामगार आज आहेत बेहाल...३
कामगार राबराबूनदेखील उपाशी
भांडवलदार खातो मात्र तुपाशी
कामगार नि शेतकऱ्यांना वाली कोण
आज दुःख त्यांचं आहे त्यांच्यापाशी...४
नेत्यांसाठी कामापुरता आपण
काम झालं की तू कोण मी कोण
चेहरे त्यांचे बदलतात एका क्षणात
नि बदलतात क्षणात आपला झोन...५
सामान्यांनी कसं जगावं
हाच एक मोठा प्रश्न आहे
नेते, अभिनेते, भांडवलदार
यांच्या घरी रोजचं जश्न आहे...६
कलियुगी महागाईचा भस्मसूर
तोपर्यंत थांबाणार नाही
जोपर्यंत शेतकरी नि कामगार
रसातळाला जाणार नाही...७

*कवी चंद्रकांत बामा पाटील*

भांडवलशाहीची संपूर्ण पायाभरणी, ही ''माणूस हे वासनांचं गाठोडं आहे'', या व्यक्तिगत-स्वार्थाला अधोरेखित करणाऱ्या डम स्मिथच्या प्रतिपादनावरच केवळ नव्हे; तर, 'भय किंवा दहशती'च्या नापाक भांडवलावर देखील झालेली आहे आणि ती तशीच अपेक्षित आहे... तर, साम्यवाद-समाजवादाचा पाया, हा समष्टीप्रति प्रेमावर आधारलेला अपेक्षित आहे. पण, घडलं ते नेमकं याच्या विपरीतच...साम्यवाद-समाजवादाची उभारणी स्टॅलिन-लेनिन-माओ-मि डेल कॅस्ट्रो वगैरेंनी पसरवलेल्या-पोसलेल्या भय व दहशतीवर झाली आणि म्हणूनच जगभरातला साम्यवाद कोसळून पडला! मानवी मनांचं उन्नयन करण्याऐवजी बंदुकीच्या नळीच्या बळावर भय-दहशतीचा हा आत्मघातकी-शॉर्टकट पत्करला गेल्याने साम्यवाद, नुसताच अयशस्वी ठरला नाही; तर, जगभरात कमालीचा बदनाम झाला, तिरस्काराचा हकनाक धनी झाला!


# डॉ. दत्ता सामंतांच्या भांडवली-व्यवस्थेकडून झालेल्या निर्घृण हत्येला जवळपास तीन दशके पूर्ण होत असताना....

**डॉ. दत्ता सामंतांचं निःपक्षपाती वृत्तीने मूल्यमापन करताना, काही व्यवधानं निश्चितच बाळगावी लागतील...तो आजचा विषय नव्हे! डॉ. दत्ता सामंतांच्या कार्यशैलीविषयी जरुर वाद असू शकतात... वाद व मतमतांतरं असावीत; पण, कामगार नेता व राजकीय नेता म्हणून, त्यांच्या प्रामाणिकपणाविषयी व लढवय्येवृत्तीविषयी शंका घ्यायला यःकिंचितही कधि जागा नव्हती...डॉ. दत्ता सामंतांसारखे आज किती कामगार नेते, राजकीय नेते आपल्याला दाखवता येतील? मी त्यांना प्रदीर्घकाळ खूप जवळून पाहिलं. मला ते 'पंपवाल्या' म्हणायचे (आधी 'खिमलाईन पंप्स' आणि नंतर मालकी व नाव बदललेल्या 'सुल्झर पंप्स' या कंपनीत काम करायचो म्हणूनच)... आमच्यात काही मतभेद होते, मतभेद असणारच; पण, त्यांच्या कारकिर्दीत माझ्या रुपाने, ते प्रथमच एखाद्या छोट्या स्थानिक-कामगारनेत्याला स्वतंत्र बुद्धीने काम करायला मोकळीक देते होणार होते...त्यामुळेच, त्यांच्याविषयीचा आदर दुणावला...आजच्या अगदी दयनीय, हवालदिल झालेल्या कामगार-चळवळीत नवी प्रेरणा जागवण्यासाठी, डॉ. दत्ता सामंताच्या स्मृतिचा यथोचित जागर करणं, म्हणूनच अत्यावश्यक आहे.**

कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्यानंतर अवघ्या कामगार-जगताला, ज्याने नुसत्या आपल्या नावानेच जैवविद्युतभारित करुन सोडलं होतं...तो कामगार-नेता म्हणजे, डॉ. दत्ता सामंत! आडनावाने 'सामंत' असले; तरी, देवबागच्या माडाच्या उंचच उंच झाडांवर सरसर चढणारा, हा ताकदवान कोकणी गडी...भांडवली-व्यवस्थेतली 'सामंतशाही' संपवू पहात होता.

आर्थिक-विषमतेला प्रचंड चालना देणाऱ्या, अत्यंत 'कामगारघातकी' भांडवली-विचारसरणीतून, ऐंशीच्या दशकापासूनच जगभरात कामगारवर्ग पुरता होरपळला जाऊ लागला होता...भारतात मात्र, डाव्या पक्षांच्या सततच्या दबावापोटी, त्याला निदान एका दशकाचा तरी विलंब झाला. महाराष्ट्रातच देशाचा औद्योगिक-विकास बव्हंशी केंद्रित असल्याने, इथल्या घराणेबाज व मराठी-अस्मितेचा 'धंदा' मांडून बसलेल्या आणि पश्चिम-महाराष्ट्रातल्या गद्दारीच्या राजकारणाचं विष, संबंध महाराष्ट्रात पसरवणाऱ्या बड्या राजकारण्यांना हाताशी धरुनच...'खाउजा-धोरणा'ची व त्याद्वारे, 'कंत्राटी-गुलामी'ची खुबीने पेरणी करण्यात आली. जागोजागी कंपन्या-कारखान्यांतून त्याकामी, ''कारखाना जगला; तर कामगार जगेल'', अशा जैन, गुज्जू, मारवाडी भांडवलदारवर्गाची 'दलाली' करणाऱ्या बुलंद घोषणा देत, 'कामगारांची मक्का' असलेली 'लालबाग'', रातोरात 'दलालबाग' बनवली गेली!

'कामगारकारण', हेच राजकारणाचं मुख्य अंग असताना... राजकारणातून 'कामगारकारण' हा विषयच बाद करण्याचं महापातक, डावे पक्ष वगळता, एकजात सगळ्याच मराठी-राजकारण्यांनी महाराष्ट्रात अहमअहमिकेने केलं. शहरी भागातून नव्वद टक्क्यांहून अधिक मराठी-माणसं, कामगार-कर्मचारी म्हणूनच उदरनिर्वाह करत असताना आणि 'कामगारकारण', हा 'मराठी-राजकारणा'चा' गाभाच नव्हे; तर, 'आत्मा' असणं गरजेचं असताना...''कामगारकारण आणि राजकारण, हे दोन्ही पूर्णतया स्वतंत्र व एकमेकाशी फटकून रहाणारे विषय असल्याचा'' विखारी-प्रचार जाणिवपूर्वक केला गेला... समस्त कामगारवर्गाची फसगत व दिशाभूल करणारे, असले हिणकस राजकीय डावपेच यशस्वी होत जाण्याचा तो अवसानघातकी कालखंड होता...आणि, महाराष्ट्राचं मोठं दुर्दैव हे की, 'मराठी-माणसा'च्या नावाने राजकारण करणाऱ्यांनी, कामगारांच्या मानगुटीवर बसवलेलं हे 'भूत' काहीकेल्या, आजही उतरायला तयार नाही आणि म्हणूनच, महाराष्ट्राच्या कामगारक्षेत्रातून जाज्वल-जातिवंत 'राजकीय-कार्यकर्ते' तयार होण्याची, डाव्यांनी कष्टपूर्वक जोपासलेली परंपरा साफ खंडित झाली, कुंठीत झाली... ती आजतागायत!



...आणि, त्याचीच अतिशय कटू फळं आणि शहरी-जीवनातली उध्वस्ततेची शिक्षा, सगळा मराठी-कामगारवर्ग भोगतोय. ''षंढ नवरा कुंकवाला आधार'', असे असणारे आपले अगदी षंढ कामगार-कायदे, पाश्चात्य देशांतील कामगार-कायद्यांसारखे धारदार-टोकदार करण्याची गंभीर स्वरुपाची गरज असताना...उलटपक्षी, आहेत ते षंढ कामगार-कायदेदेखील नष्ट करुन, कामगार-कर्मचारीवर्गावर व त्यांच्या पुढील पिढ्यापिढ्यांवर अखंड गुलामगिरी लादण्याचं षडयंत्र, त्यामुळेच या देशात, 'हिंदुत्वा'च्या व 'हिंदुराष्ट्रा'च्या ढोंगी-घातकी मुखवट्याआड सुरुच आहे.

''डॉ. दत्ता सामंत, दत्ता सामंत...दे दणादण, दे दणादण'' हा, तेव्हाच्या कामगारक्षेत्रातील 'सामंती-पर्वा'त, भर उन्हात तळपणार्या धामणीसारखा सळसळणारा, एक मंत्रोच्चारच जणू कामगारविश्वात बनला होता. त्यानंतर, आजतागायत कुठल्याच कामगार-नेत्याची औकात कधि उभी राहिली नाही की, त्याने एकहाती डॉ. सामंतांच्या हत्येपश्चात निर्माण झालेली, ती पोकळी भरुन काढावी! ...आणि, अनेक कारणांनी ते तसं होऊ शकणारं नव्हतंच; म्हणूनच, ही हत्या 'खाउजा-धोरण' (खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण) राबवण्यादरम्यानच्या, नव्वदीच्या दशकाच्या उत्तरार्धात घडवली गेली. पुढे यथावकाश मारेकरी सुटले, ते सुटणारच होते, आधी ठरल्यासारखे.

डांग्यांनंतरच्या डाव्या चळवळीतील, मी मी म्हणणाऱ्या कामगार नेत्यांना जे कधि जमलं नाही; ते 'डॉक्टरांनी करुन दाखवलं'...ते म्हणजे 'Paying capacity of the corporates'' त्यांनी प्रथमच दाखवून दिली...किंवा, दुसऱ्या शब्दात सांगायचं; तर, कामगारांच्या रक्ताघामाची दीर्घकाळ चाललेली लूट, त्यांनी अल्पावधीतच आपल्या घणाघाती व शीघ्रगती 'सामंतीशैली'मुळे मुंबई-ठाण्याच्या रस्त्यावर उघड्यावर आणून ठेवली...

जशा 'मराठीत्व आणि हिंदुत्व' या, परस्परविरोधी बाबी आहेत; म्हणजेच, 'हिंदुत्वा'चं पाणी पडलं की, 'मराठीत्वा'ची आग विझलीचं समजायची... तशीच, मूलतः 'भांडवलशाही व लोकशाही', या 'आग आणि पाण्या'सारख्या 'परस्परविरोधी' संकल्पना! प्रत्यक्षात, ज्याला आपण 'Democracy at work'' म्हणतो, ती खरीखुरी लोकशाही-परंपरा अंशाने तरी, आपल्याला कधि कुठल्या 'कॉर्पोरेटीय-व्यवस्थे'त दिसते? ज्यावर, आजच्या भांडवली-व्यवस्थेत आपलं सगळं अस्तित्व अवलंबून आहे व जिथे आपल्या आयुष्याचा सगळ्यात मोठा आणि महत्त्वाचा वेळ व्यतीत होतो, तिथेच कायम नृशंस-संवेदनशून्य भांडवली-हुकूमशाही चालत रहावी व आपण ती चालवून देत रहावी?

**शीतयुद्धाच्या कालखंडात जोपर्यंत, अमेरिकन-युरोपीय भांडवली-जगताला, रशियन वा चिनी साम्यवाद-समाजवादाचं थेट आव्हान होतं; तोपर्यंतच, लोकशाहीचा व व्यक्ति-स्वातंत्र्याचा खोटा मुखवटा घालून भांडवलशाही पुतनामावशीसारखी जगभरात वावरत राहिली. पण, शीतयुद्ध समाप्तीनंतर 'नवउदारमतवादा'च्या** (Neo-Liberalism) **रुपानं तिचं शूर्पणखेसारखं भेसूर-नृशंस 'सत्यस्वरुप' जगासमोर आल्यावाचून शिल्लक राहू शकलं नाही! जोडीला, मानवजातीसह अवघी सजीवसृष्टी उध्वस्त करु पहाणाऱ्या 'जागतिक-तापमानवाढी'सारख्या** (Global Warming) **पर्यावरणीय-महासंकटांची मालिका, हे अजूनच एक वेगळंच भयंकर उत्पाती 'भांडवली-अपत्य' त्यातूनच जन्माला आलं!**

''स्टॅलिन-माओच्या कालखंडात परिस्थितीवशात झालेल्या दुर्दैवी रक्तपाताला व कम्युनिस्टांच्या झेंड्यातील लाल रंगाला'', एकाच नाण्याच्या दोन बाजू कल्पून भांडवली-व्यवस्थेनं...'समाजवाद व साम्यवादा'ला जगभरात जनसामान्यांमध्ये केवळ नाहक बदनामच ...पृष्ठ क्र. १३ वर

# दावोस परिषद...




परकीय गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी, भारतातील राज्याराज्यांत स्पर्धा? मला वाटले त्यासाठी दावोसला राष्ट्रांराष्ट्रांत स्पर्धा असते?

इतर अनेक राष्ट्रांप्रमाणेच भारताच्या केंद्र सरकारच्या मंत्री/अधिकाऱ्यांचे एक पथक, दरवर्षीप्रमाणे तेथे गेले आहे. देशाच्या आर्थिक विकासासाठी परकीय भांडवल, तंत्रज्ञान आकर्षित करणे हा, गाभ्यातील उद्देश असतो. फाईन!

यावर्षी महाराष्ट्र, मध्यप्रदेश, आसाम, आंध्रप्रदेश, तेलंगणा, झारखंड यांचे मुख्यमंत्री आणि कर्नाटक, गुजरातचे उप-मुख्यमंत्री गेले आहेत किंवा जाणार आहेत. याचवर्षी नाही; तर, दरवर्षी कोणत्या ना कोणत्या राज्याकडून असे राजकीय नेते/प्रतिनिधी जातात. ते भारतीय प्रतिनिधी मंडळाचा एक भाग म्हणून जात असतील; तरदेखील, समजू शकते.

पण, इथे उद्देश बदलतो. आमच्या राज्यामध्ये गुंतवणूक करा, आमचे राज्य देशातील इतर राज्यांच्या तुलनेत गुंतवणूकदार-स्नेही आहे! असा मेसेज देण्याचे त्यांचे उद्दिष्ट असते.

राज्यांच्या मुख्यमंत्री, मुख्य-मंत्र्यांमध्ये भाजपचे आहेत, तसेच काँग्रेस, तेलगू देसम आणि झारखंड मुक्ती मोर्चा या बिगर भाजप पक्षांचेदेखील आहेत. हे नमूद करूया.

**आपला मुद्दा वेगळा आहे...**

कंपनी कायद्यातील परकीय कंपन्यांसाठीच्या तरतुदी, परकीय गुंतवणूक करण्याचे वा वेळ आली तर, ती विकून टाकण्याचे, परकीय कंपन्यांवर आयकर, मशिनरी आयातीसाठी आयातकर आणि असे अनेक यम नियम, सर्वकाही केंद्र सरकारच्या/रिझर्व्ह बँकेच्या आणि संबंधित नियामक मंडळांच्या अखत्यारीत आहे.

याचा अर्थ महत्त्वाचा आहे. तो असा की, परकीय गुंतवणूकदारांनी कोणत्याही राज्यात गुंतवणूक केली तरी, लागू होणारे हे सर्व नियम सारखेच असतील. Location Neutral. कोणत्याच राज्याला अधिकारच नाही, परकीय गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी, त्यात कोणतेही कन्सेशन देण्याचा...

दुसरी बाब पायभूत सुविधांची, ज्यामुळे परकीय गुंतवणूकदार विशिष्ट राज्य निवडतात... पण, पायभूत सुविधाक्षेत्रातदेखील मोठा वाटा केंद्रीय अर्थसंकल्पाचा येतो. गेली काही वर्षे केंद्र सरकार, सरासरी १० ते १२ लाख कोटी (दरवर्षी) यात गुंतवणूक करत आहे. राज्यांचा वाटा कमीच.

कामगारविषय राज्याच्या अखत्यारीत आहे... पण, कामगार संहितामुळे आता देशभर एक बरीचशी एकजिनसी कामगार-कायदे फ्रेम अमलात येणार आहेत.

मग राज्ये परकीय गुंतणूकदारांना आकर्षित करण्याची स्पर्धा करताना काय सांगत असतील? अर्थात, त्या गोष्टी ज्या राज्य सरकारांच्या अखत्यारीत आहेत. तेवढेच!

त्यात प्रामुख्याने परकीय गुंतवणूकदारांना जमीन, मुबलक पाणी, वीज देऊ करण्यात येऊ शकते आणि कामगार आणि पर्यावरणीय कायदे शिथिल करता येऊ शकतात. याचा डायरेक्ट संबंध शेतकरी, कामगार आणि प्रदूषण/पर्यावरणाशी; म्हणजे, सामान्य नागरिकांशी आहे.

हे बोली लावण्यासारखे होत असते. एक परकीय कंपनी तामिळनाडूकडे जाऊन सांगणार, बघा महाराष्ट्र अमुक गोष्टी ऑफर करत आहे, तुम्ही त्यापेक्षा चांगले देऊ शकता का? परकीय कंपन्या आधी एका राज्यात येण्याचे ठरवतात, मग बातमी येते की, त्यांनी दुसरे राज्य निवडले आहे. मधल्या काळात काय होत असेल?कल्पना करू शकता.

देशाबाहेरील परकीय गुंतवणूकदारांसकट, कोणत्याही एजन्सीसमोर देश म्हणून सामोरे गेले पाहिजे.

एक काळ असा होता की, औद्योगिकीकरण न झालेल्या देशाच्या अविकसित भूभागात, नवीन उद्योग जावेत म्हणून केंद्र सरकारच्या वेगळ्या योजना/प्रयत्न/तरतुदी असायचे. आता भांडवली गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी, राज्यांना आपापसात स्पर्धा करावी लागत आहे.

याचा संबंध देशातील असमान आर्थिक विकासाशी आहे. याचा संबंध देशांतर्गत स्थलांतरण आणि त्यातून तयार होणाऱ्या सामाजिक/राजकीय प्रश्नांशी आहे

*....संजीव चांदोरकर*

## डॉ. दत्ता सामंतांच्या.... ...पृष्ठ क्र. ७ वरुन

केलं नाही; तर, त्याविषयी एक फार मोठी भ्रामक-दहशत निर्माण केली. मार्क्सवादाच्या आपल्या चुकीच्या आकलनातून, मराठी कामगार-कर्मचारीवर्ग, अशा कामगारघातकी-संकल्पना कवटाळून बसू लागला. कधि मराठीत्व, तर कधि हिंदुत्व... अशा परस्परविरोधी दोन्ही टोकांवर 'लंबका'सारख्या फिरणाऱ्या मराठी-राजकारण्यांनी त्यांना...पोकळ-ढोंगी धर्मसंप्रदायी पंथ व सण-सार्वजनिक उत्सव, यांच्या अवसानघातकी फाजील-उत्सवप्रियतेत अडकवून पुरतं फसवलं. कम्युनिस्टांना 'लाल माकडं' संबोधून व कृष्णा देसाईंसारख्या कम्युनिस्ट नेत्यांच्या हत्या घडवून, 'साम्यवादा'ला जनसामान्यांच्या विचारविश्वातून बाद करण्याचं महापातक केलं गेलं...त्यातूनच गिरणी-कामगारांचं क्रांतिमैदान असलेली 'लालबाग', 'दलालबाग' बनली! हा मराठ्यांचा घात करणारा सिलसिला इथेच थांबला नाही; तर तो थेट लढाऊ कामगारनेते डॉ. दत्ता सामंतांच्या हत्येपर्यंत पोहोचला.

...द. कोरियासारख्या अनेक अर्थव्यवस्था मुळातूनच 'उत्तम-वेतन संरचने'च्या म्हणूनच तिथल्या राजकारण्यांनी आखलेल्या आणि जगभरातल्या प्रगत पाश्चात्य देशात, तेथील कामगारवर्ग व कामगार-नेतेच त्या त्या देशातील राजकारण प्रामुख्याने चालवत असतानाची.... आपल्या देशातील, कामगार-कर्मचारीवर्गाची ही अशी किंकर्तव्यमूढ अवस्था असावी? जी अवस्था मराठी-कामगारांची; तिचं अवस्था, पहिली साम्यवादी-क्रांती झालेल्या सोव्हिएत रशियाची... नव्वदीतल्या सोविएत युनियनच्या पतनानंतर, साधा निषेध म्हणूनही रशियन कामगारांनी ना संप केला, ना ते रस्त्यावर उतरले... रशियन कामगारवर्गाची 'राजकीय-प्रशिक्षणशून्यता' अगदी लाजिरवाण्या पद्धतीने जगासमोर त्यातून उघडी पडली! महाराष्ट्रात डॉ. दत्ता सामंतांसारख्या लढवय्या कामगार-नेत्याची भांडवली-व्यवस्थेकडून कट रचून हत्या झाल्यानंतरदेखील, मराठी-कामगाराने घरात बसून रहाणंच पसंत केले.

सगळ्या कामगार-कर्मचारीवर्गाची, अन्यायी, अत्याचारी, दमनकारी असलेल्या भांडवली-व्यवस्थेसंदर्भातील एवढी आत्मघातकी उदासीनता निदर्शनास आल्यामुळेच...डॉक्टरांचे मारेकरी आरामात सुटणे व हत्येचे सूत्रधार कधिही हाती न लागणे, हे घडणं अटळ प्राक्तन होतंच.

१६ जानेवारी-१९९७ रोजी कामगार-चळवळीचं एक पर्व संपलं... डॉक्टरांच्या मृत्यूसोबतच कामगार-चळवळीची मृत्यूघंटा वाजायला सुरुवात होणार होती व ती लागलीच कर्णकर्कश्श स्वरात घणघणायला देखील लागली. तळागाळातील मराठी-श्रमिकांसाठी लढणारे व सदैव संघर्षरत असलेले कामगार-नेते डॉ. सामंत गेले; पण, तरीही, हाडामांसी खिळलेल्या जुन्या सवयीने, नेतृत्त्वहीन झालेल्या मराठी-कामगारविश्वाच्या आसमंतात पोकळ राजकीय-घोषणा घुमत राहिल्या ''जय भवानी, जय शिवाजी, जय भीम''!

...कामगार-चळवळ, मराठीचं राजकारण करणाऱ्यांकडूनच मारली गेली; तरीही त्या घोषणा उरल्यासुरल्या हतवीर्य, दिशाहीन झालेल्या कायम-कामगारांच्याच नव्हे; तर, आजच्या घडीला तद्दन 'गुलाम' असलेल्या 'कंत्राटी-कामगारां'च्या तंबूतूनही, आजही ऐकू येत रहातात... 'संपत्ती-निर्मात्या'च्या, या अवनत अवस्थेला नेमकं काय म्हणायचं...???

**।। जय महाराष्ट्र, जय हिंद ।।**

**(संयुक्त-महाराष्ट्रानंतर, आता 'स्वायत्त-महाराष्ट्र'... राष्ट्रांतर्गत राष्ट्र, 'स्वायत्त-महाराष्ट्र'!)**

***...राजन राजे*** (अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)

विकासाच्या हव्यासापोटी मानवानं घातला घोळ,
विज्ञानाचा अतिरेक, केला निसर्गाचा बट्ट्याबोळ.
निसर्गाचं महत्व पटवून देण्यासाठी येते मग नैसर्गिक आपत्ती.
उपाय करता करता कळत नाही हाताबाहेर कधी गेली परीस्थिती.

मानवी कुकर्माचा सुड म्हणून कोसळतोय वरुण राजा,
पिकं अन् शेतांची नासाडी, आसवं गाळी बळीराजा.

पहाणी करती नेते कधी आकाशातून तर कधी बांधावर.
अटी नियम भरपाईचे पाहून वाटे, भिक नको पण कुत्रं आवर.
भरपाई येता येता पंचनामे राहती केवळ कागदावर.

हर एक वेळी राजकारण करण्याचे फुटलेत आता पेव,
कुठे लाडकी बहिण, कुठे आरक्षण, तर कुठे आय लव मुहम्मद,
आय लव महादेव.

रोषणाईने नटलेल्या शहरांमधून घूमतोय गरबा दांडियाचा सूर,
पाण्यात उभा बळीराजा साकडं घाली देवीला ओसरण्या महापूर.

शिवायलाच आता जमेना जागोजागी उसवलेलं आभाळ,
आ वासून उभा दारी ओला दुष्काळ ,ओला दुष्काळ...

*तरुणांना रोजगार दिले, शेतकऱ्यांना संतुष्ट केले,*
*स्त्रियांना सक्षम केले, विद्यार्थ्यांना शिक्षण दिले,*
*आरोग्य-व्यवस्था सुधारली,*
*तर मग, आमच्या मागे तरुणांची फौज कशी येणार?*
*अडचणीत असल्याशिवाय, ते आमचे लाचार-लाभार्थी कसे होणार?*
*त्यांना दोन वेळचे जेवण आणि हातात एक खंबा दिला नाही तर,*
*आम्ही आमचे मतलबी राजकारण कसे साधणार?*
*तरुण, शिक्षणामुळे विचार करायला लागले,*
*रोजगार मिळवायला लागले, आरोग्यपूर्ण स्वस्थ झाले,*
*प्रश्न विचारते झाले, सर्वार्थाने सक्षम झाले...*
*तर, आमची खुर्ची कशी टिकणार?*



*अशा मानसिकतेचे नेते असल्यामुळेच,*
*बेरोजगारी मुद्दामहुन वाढवली जात आहे,*
*आरोग्यवस्था खिळखिळी केली जात आहे,*
*स्त्रियांना अकार्यक्षम केले जात आहे,*
*शेतकऱ्यांना असंतुष्ट ठेवले जात आहे,*
*शिक्षणाचा खेळखंडोबा केला जात आहे.*
*तरुणांनो जागे व्हा,*
*राजकारण्यांचा मतलबी कावा ओळखा...*
*त्यांच्या सात पिढ्यांचा उद्धार करण्यासाठी,*
*तुम्ही कंगाल का होताय?*
*इथे तुम्ही उचलताय त्यांचा झेंडा...*
*आणि,*
*त्यांची मुले मात्र, लावताहेत परदेशी झेंडा!*
*नेत्यांची मुले 'स्टडी'त तर, तुम्ही मात्र 'पोलीस कस्टडीत'!!*
*नेते गुन्हे करुनही करतात परदेशी वाऱ्या,*
*तुमच्या नशिबी मात्र, गुन्ह्यातून सुटण्यासाठी न्यायालयाच्या फेऱ्या !!!*
*विचार तर कराल...???*

*....जगदीश काबरे*

# बूट कुणाला मारलाय? बूट कुणी मारलाय?

पायातली चप्पल, नरकाच द्वार, चूल आणि मुल याम ध्येच अडकून राहण्यासाठी बाईला बूट मारलाय.

शिक्षण घेऊन अर्थार्जन करणाऱ्या सावित्रीच्या लेकीला बूट मारलाय.

ज्या इंग्लंड अमेरिकेत बाईला मताधिकार मिळायला आंदोलन करायला लागली तो मताधिकार मिळालेल्या भारतीय बाईला बूट मारलाय.

राजा का बेटा नही , जो योग्य है वही राजा बनेगा अशी खात्री देणाऱ्या संविधानाला बूट मारलाय.

माणस, सरकार, व्यवस्था , कार्यपालिका कुणाकडूनही अन्याय झाला तर ज्या न्यायपालिकेचा सामान्य माणसाला शेवटचा आधार वाटतो त्या नायपालिकेच्या तोंडावर बूट मारलाय.

जन्म या अपघाताने तुम्ही कोणत्याही धर्मात, वंशात, जातीत जन्मला असला तरी तुमच रक्त लाल आहे , माणसांची सगळी लेकर समान आहेत हे सांगणाऱ्या राज्यघटनेवर बूट मारलाय.

माणसाला आपल्या माणूस असण्याचे भान देणाऱ्या बाबासाहेब आंबेडकरांना बूट मारलाय.

समता, सहिष्णुता, बंधुभाव, धर्मनिरपेक्षता या सगळ्या मुलभूत तत्वांच्या तोंडावर बूट मारलेला आहे.

माणूसपणा, शहाणपण व शाबूत असलेल्या प्रत्येक माणसाच्या थोबाडावर बूट मारलेला आहे.

## बूट कुणी मारलाय?

ज्यांनी शंबुक मारला, ज्यांनी चार्वाक जाळला, ज्यांनी एकलव्याचा अंगठा मागितला, ज्यांनी ज्ञानेश्वर माउलीना वाळीत टाकलं. ज्यांनी चक्रधरांचा खून केला, ज्यांनी तुकारामाचा खून केला, ज्यांनी एकनाथांच्या मुलाला जिवंतपणी बापाचा दिवस घालायला लावला, ज्यांनी शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक नाकारला, ज्यांनी जिजामातेच चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला, ज्यांनी ज्योतिबा - सावित्रीमाईवर शेणाचे गोळे फेकले, ज्यांनी राजर्षींच्या बद्दल घाणेरडे विनोद पसरवले, ज्यांनी आगरकरांची जिवंतपणी प्रेतयात्रा काढली, ज्यांनी गांधीजींची हत्या केली, ज्यांनी प्रतीसरकारचे क्रांतिकारक पकडून दिले, ज्यांनी दाभोलकर, पानसरे, कलबुर्गी, गौरी लंकेशना मारलं, ज्यांनी माणसाच माणूसपण नाकारलं, ज्यांनी समता नाकारली.

त्यांनी प्रत्येक भारतीयाच्या थोबाडावर बूट फेकून मारला



आहे. आणि नुसता बूट फेकून मारलेला नाही; तर, तुम्हाला स्पष्टपणे सांगितलेल आहे. हिंदू म्हणून तुम्ही कितीही उड्या मारल्या आणि कितीही बलिदान दिली, त्याग केला, स्वतःच्या बोकांडी कोर्टकज्जे खटले घेतले, लोकांची डोकी फोडली तरीही तुम्ही आमच्या बरोबरीला नाहीत, तुम्ही शूद्रच - अतीशूद्रच आहात.

गोळीला तुम्ही आणि पोळीला आम्ही हेच अंतिम सत्य आहे. त्यांनी बूट तुमच्या थोबाडावर फेकला आहे. तुमच उत्तर काय असाव हे संविधानाने सांगितलेलं आहे.

*आम्ही भारताचे लोक*
*आयडिया ऑफ इंडिया*


# कोकणचा मुस्लिम मराठी माणूस : मातीशी नातं, काळाशी संघर्ष

महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीत जन्मलेला कोकणी मराठी मुस्लिम माणूस हा मातीशी घट्ट जोडलेला आहे. त्या मातीत त्याचा श्वास आहे, कोकणच्या लाल मातीवर पाय ठेवून वाढलेला मुस्लिम मराठी माणूस हा केवळ एका धर्माचा प्रतिनिधी नसून तो महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. त्याची भाषा मराठी आहे, विचार मराठी आहेत आणि त्याचं मन कोकणच्या समुद्रासारखं शांत, खोल आणि प्रामाणिक आहे. घरी बोलली जाणारी कोकणी ढंगाची मराठी, त्यात मिसळलेली उर्दूची गोडी, आणि गावच्या माणसांशी बोलताना जाणवणारी आपुलकीहे सगळं त्याच्या संस्कृतीचं वैशिष्ट्य आहे.

**साधी राहणी, मोजकी गरज, कष्टावर विश्वास आणि मेहनतीवर उभा असलेला उदरनिर्वाहही त्याची जीवनपद्धती. शेती आणि मासेमारी हीच त्याची खरी पाठराखण. शेती आणि मासेमारी हीच त्याची खरी पाठराखण. पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली भातशेती, नारळ-सुपारीची बाग, आणि समुद्रात टाकलेली जाळीयातूनच घर चालायचं. पूर्वी शेती हेच उदरनिर्वाहाचं प्रमुख साधन होतं. भाताची पेरणी, आंब्याच्या बागा, नारळाची झाडं आणि पावसावर अवलंबून असलेलं आयुष्ययातच संपूर्ण कुटुंबाची गाडी चालायची. वडील शेतात राबायचे, आई घर आणि लेकरांची जबाबदारी सांभाळायची, आणि कुटुंब एकत्र राहून सुख-दुःख वाटून घ्यायचं यातच समाधान शोधणारी ही पिढी होती.**

मात्र काळ बदलला. शिक्षण वाढलं, गरजा वाढल्या आणि शेती पुरेशी न राहिल्याने रोजगारासाठी परदेशी जाणं अपरिहार्य झालं. शिक्षण, आरोग्य, लग्नकार्य, घरबांधणीया सगळ्यांचा भार खांद्यावर आला आणि कोकणी माणसाला परदेशाची वाट धरावी लागली. हे स्थलांतर हौसेपोटी नव्हतं, तर संपूर्ण कुटुंबाची जवाबदारी पेलण्यासाठी घेतलेला कठोर निर्णय होता.कुटुंबासाठी काहीतरी करायचं या एकाच ध्येयाने अनेक कोकणी मुस्लिम तरुणांनी अरब देशांची वाट धरली. परदेशात नोकरी, चांगला पगार, पण त्याच वेळी आई-वडिलांपासून, बायको-मुलांपासून, गावापासून दूर राहण्याची किंमत मोजावी लागली. आखाती देश, आफ्रिका, आणि पुढे युरोप-अमेरिकेत पसरलेलं कोकणी माणसांचं जाळं याच संघर्षातून उभं राहिलं.

परदेशात राहूनही तो आपली भाषा, कोकणी संस्कृती, कोकणी पदार्थ, आपले सण, आपली ओळख विसरला नाही. तिथेही कोकणी माणूस एकमेकांना धरून राहिला मशीद, जमात, आणि गावच्या नावानं ओळख निर्माण करत. परदेशात मिळणाऱ्या पगारातला मोठा हिस्सा गावाकडे पाठवला जातो. घराची दुरुस्ती, नवीन बांधकाम, रस्ता, पाण्याची सोय, मशीद, मदरसाया सगळ्यांसाठी कोकणी माणूस आर्थिक पुंजी जमा करतो. स्वतःसाठी कमी, पण गावासाठी जास्तही त्याची वृत्ती आजही जिवंत आहे. गावाचा विकास व्हावा, पुढच्या पिढीला चांगलं आयुष्य मिळावं, हीच त्याची खरी कमाई.



**कोकणी मराठी मुस्लिम माणूस हा संघर्ष, कष्ट आणि संस्कार यांचा संगम आहे. महाराष्ट्राच्या मातीवर प्रेम करणारा, मराठी भाषेला जपणारा, आणि परदेशात राहूनही गावासाठी धडपड करणारा हा माणूस आज उभा आहे एका वळणावर. कदाचित काळ परत फिरणार नाही; पण गावाशी नातं टिकवणं, शेतीकडे पुन्हा पाहणं, आणि जुन्या आठवणींना नव्या पिढीपर्यंत पोहोचवणं हे आपण नक्की करू शकतो.**

**भूतकाळात एकत्र कुटुंब, सामूहिक निर्णय आणि आपुलकी होती. आज मात्र वेळ, अंतर आणि व्यस्तता यामुळे कुटुंब व्यवस्थेत दुरावा निर्माण होत चालला आहे. भूतकाळातलं जीवन साधं होतं, पण नात्यांनी समृद्ध होतं. आज वर्तमानकाळात सुविधा वाढल्या, पैसा आला; पण माणसामाणसांमधील जवळीक कमी झाली. एकत्र कुटुंबाचं रूप हळूहळू विभक्त कुटुंबात बदललं. मोबाईलवर बोलणं वाढलं, पण समोरासमोर बसून मनमोकळं बोलणं कमी झालं.**

गावाकडे पाहिलं तर ही बदलाची वेदना अधिकच बोचते. शेती मोकळी पडते आहे, रान वाढत आहे, आणि अनेक घरे ओसाड पडली आहेत. कधीकाळी आजोबांच्या गोष्टींनी गजबजलेली अंगणं आज शांततेने भरलेली आहेत. जुनी माणसं एकामागोमाग एक निघून जात आहेत, आणि त्यांच्यासोबतच गावाचा इतिहास, आठवणी आणि संस्कारही हळूहळू पुसट होत चालले आहेत.

**ही स्थिती केवळ सामाजिक बदल नाही, तर चिंतेची बाब आहे. माणूस प्रगती करत असताना आपली मुळं विसरत असेल, तर ती प्रगती अपूर्ण ठरते. कोकणी मुस्लिम मराठी माणसाची ओळख ही, त्याच्या धर्माइतकीच त्याच्या भाषेत, मातीमध्ये आणि संस्कृतीमध्ये रुजलेली आहे. ती जपणं ही फक्त जबाबदारी नाही, तर पुढील पिढीसाठीची गरज आहे.**

कोकणी मराठी मुस्लिम माणूस हा संघर्ष, कष्ट आणि संस्कार यांचा संगम आहे. महाराष्ट्राच्या मातीवर प्रेम करणारा, मराठी भाषेला जपणारा, आणि परदेशात राहूनही गावासाठी धडपड करणारा हा माणूस आज उभा आहे एका वळणावर. कदाचित काळ परत फिरणार नाही; पण, गावाशी नातं टिकवणं, शेतीकडे पुन्हा पाहणं, आणि जुन्या आठवणींना नव्या पिढीपर्यंत पोहोचवणंहे आपण नक्की करू शकतो. विकासाच्या वाटेवर चालताना आपली ओळख, शेती, कुटुंबव्यवस्था आणि आठवणी जपणं ही काळाची गरज आहे. कारण शेवटी, माणूस कितीही दूर गेला तरी त्याच्या मनाचा पत्ता मात्र कोकणच्या मातीवरच असतो.

***कमरुद्दीन इस्माईल परकार***

---

हिंसाचाराने काही सामाजिक-राजकीय प्रश्न अनपेक्षितरित्या झटपट सुटताना दिसतात...काही प्रसंगी, त्यातूनच अचानक एखादं नवं नेतृत्त्व समाजात निर्माण होऊन जातं, ज्याचा खरा 'कस' पुढील काळात लागायचा असतो; पण, त्या हिंसाचाराचं नियंत्रण व यथावकाश निर्दालन करण्याच्या दृष्टीने, त्याचं 'व्यवस्थापन' महाकर्मकठीण होऊन बसतं. रामायणकाळात राम, महाभारतात श्रीकृष्ण किंवा काही शतकांपूर्वी छत्रपती शिवाजीमहाराज...यासारख्या अलौकिक-असाधारण व्यक्तित्वांनाच ते आव्हान पेलता आलं, अन्य कोणाला नव्हे! रशिया-चीन वगैरे देशांत साम्यवादी (कम्युनिस्ट) लालक्रांती झाली खरी; पण, त्यादरम्यान अपरिहार्यपणे मोठ्याप्रमाणावर घडलेल्या हिंसाचाराचं 'व्यवस्थापन' नीट होऊ न शकल्याने, साम्यवादी-राजवटीचा तो केवळ पायाच नव्हे; तर, मूळ गाभा बनला!




लालबाग हळूहळू भगवा होऊ लागला होता... लाल बावटे की जय अशी बेंबीच्या देठापासून घोषणा देणाऱ्यांची मुलं, शिवसेनेचा भगवा लालबागमधून नाचवू लागली, तेव्हा गाफिल राहिलेल्या कम्युनिस्टांना त्याची फळं ५ जून-१९७० यादिवशी भोगावी लागली. लालबागचे कम्युनिस्ट आमदार, कृष्णा देसाईंचा खून काँग्रेसच्या वसंतराव नाईकांच्या छत्रछायेखाली पसरु लागलेल्या शिवसेनेने केला. पाठोपाठच कृष्णा देसाईंच्या खूनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत कृष्णा देसाईंच्या पत्नीचा पराभव करुन शिवसेनेचे वामनराव महाडिक विधानसभेत पोहोचले...

त्यानंतर वरळी-नायगाव परिसरात शिवसेनेच्या इट का जबाब पत्थर से द्यायला १९७२ला जन्मलेल्या पँथरने सुरवात केली. वरळी-नायगावात दररोज राडे सुरु झाले. त्या राड्यांमध्ये लालबागमध्ये पँथर भागवत जाधव १० जानेवारी-१९७४ रोजी शहिद झाला. पाठोपाठ १० फेब्रुवारीला, पोलीस गोळीबारात वरळीमध्ये पँथर रमेश देवरुखकर शहिद झाला. अखेर इंदिरा गांधींनी लावलेल्या आणीबाणीत बाळ ठाकरेंनी इंदिरा गांधींचरणी लोळण घेतली; तर, पँथर नामदेव ढसाळने आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : इंदिरा ही दीर्घ काविता लिहिली. या पाठोपाठ शिवसेनेचा प्रभाव मोडून काढीत, दत्ता सामंतांचा प्रभाव या परिसरात वाढत असताना, काँग्रेसचा राष्ट्रीय मिल मजदूर संघाचा तिरंगा मात्र, जागा सोडायला तयार नव्हता.

दत्ता सामंतांनी पुकारलेल्या गिरणी संपात उध्वस्त झालेल्या गिरणी कामगारांची मुलं, हाजी मस्तान-करीम लाला-दाऊद करीत करीत, दगडी चाळीतल्या अरुण गवळी, डिलाईल रोडच्या अमर नाईककडे वळायला लागली होती. या काळातच अरविंद, गिरण्यांच्या गेटवर कम्युनिस्ट विचारधारेची पुस्तके विकायचा. ही पुस्तके विकता विकताच, आमदार निवासच्या कॅन्टीनसमोरील जागेत पुस्तक प्रदर्शन भरवायला काही काळासाठी जागा अरविंदने मिळवली आणि मनोविकास प्रकाशनाचा तोच आरंभबिंदू ठरला.

आमदार निवासात अनेक आमदार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची वर्षाचे बारा महिने वर्दळ असायची. अनेक पक्ष-संघटनांचे मोर्चे यायचे, अनेकजण आपापल्या अडचणी- समस्या घेऊन मंत्र्यांकडे यायचे. अनेक शासकीय कर्मचारी यायचे. या साऱ्यांचा अनेक शासकीय कायदे, कामकाजांची माहिती असलेली पुस्तके 'मनोविकास'च्या बुकस्टॉलवर हमखास मिळायचीच. याचा पुरेपुर लाभ अरविंदने घेतला आणि एका पाठोपाठ एक पुस्तके प्रकाशित करायला त्याने सुरुवातच केली. त्याची वैचारिक बांधीलकी असलेल्या डाव्या विचारांच्या लेखकांच्या पुस्तकांपेक्षाही, बुद्ध-फुले-आंबेडकरी विचारांच्या पुस्तकांना असलेली वाढती मागणी अरविंदच्या लक्षात आली आणि वसंत मुन, गौतम शिंदे, अभिताभ, हरिश खंडेराव, सचित तासगावकर, राजा जाधव, राजा गायंगी, अशोक चक्रवर्ती, जयवंत हिरे, शिवाजी गावडे, कमलाकर राऊत, वैभव काळखैर आदी कवी-साहित्यिकांचा गोतावळा, 'मनोविकास'कडे जमू लागला.

याचदरम्यान 'अंधश्रद्धा निर्मुलन समिती'चे श्याम मानव यांचीही बरीच पुस्तके अरविंद पाटकरने प्रसिद्ध केली होती. सामाजिक समता, बुद्धिप्रामाण्यवाद, अंधश्रद्धा निर्मुलन, वैज्ञानिक घडामोडी, पर्यावरण, शैक्षणिक पुस्तके, मनोविकास प्रकाशनाकडून एकापाठोपाठ एक प्रकाशित होऊ लागली. हा हा म्हणता, 'मनोविकास' तत्कालीन मॅजेस्टिक, बाँबे बुक डेपो, आयडियल प्रकाशनासोबतच ग्रंथाली, लोकवायय गृह, सुगावा प्रकाशन आदींच्या रांगेत जाऊन प्रस्थापित झाले. अरविंद पाटकर आणि त्याच्या 'मनोविकास'ने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. मुंबईच्या आमदार निवास येथील बुकस्टाल सांभाळतच, अरविंदने पुण्यातही आपले बस्तान बसवले.

आंबेडकरी चळवळीतील सुरेंद्र अज्ञात यांच्या क्रिटिक्स इन वेदाजचा गौतम शिंदे यांनी मराठीमध्ये केलेल्या वेदांचे खरे स्वरुप या अनुवादाचे 'मनोविकास'ने केलेले प्रकाशन अतिशय भक्तिभावाने असंख्य वाचक घ्यायचे आणि लेखक-अनुवादकासह, प्रकाशक अरविंद पाटकरच्याही सतरा पिढ्यांचा उद्धार करायचे. वेदांचे खरे स्वरुप निर्भयतेने प्रसिद्ध करणारा अरविंद, पेरियार रामस्वामी यांनी वयाच्या ९४व्या वर्षी दिलेल्या भाषणाचा, गौतमने केलेला बुद्धिवादी विचारसरणी हा अनुवाद, त्यातील पेरियार यांच्या देव आहे असे म्हणणारे मूर्ख आहेत. देव आहे असे म्हणणारे रानटी आहेत. जे देव आहे असे म्हणतात, त्यांची चपलेने पूजा का करु नये? अशा ईश्वर आणि ईश्वर-भक्तांबाबतच्या पेरियार यांच्या प्रक्षोभक हल्लयांमुळे प्रसिद्ध करण्यास डळमळला होता.

अखेर पेरियार यांचे बुद्धिवादी विचारसरणी हे पुस्तक, मी माझ्या तक्षशिला प्रकाशनाच्या वतीने प्रसिद्ध केले होते. या पुस्तकाची अलिबागच्या सासवणे येथे छपाई चालू असतांना, त्यातील प्रक्षोभक भाषेमुळे माझ्या खूनाचा रचलेला कट बाजूच्या गावातील एका मित्राने मला सावध केल्यामुळे अपयशी ठरला होता आणि मी १९९०मध्ये मरणाच्या दाढेतून वाचलो होतो. बऱ्याच वर्षांनी करोनाच्या मरण-लाटेनंतर, चर्चगेट स्टेशनकडे जात असताना रस्त्यात अरविंद पाटकरची भेट झाली. खूप काळाने भेट झाल्याने पाटकर अरे हिरे, कसा आहेस? खूप दिवसांनी भेट होतेय. चल काहीतरी खाऊया म्हणत जवळच्या हॉटेलमध्ये आग्रहाने घेऊन गेला. बऱ्याच गप्पा झाल्या. त्यानंतर आज अरविंदने अलविदा कळवलेय... एक रस्त्यावर पुस्तके विकणारा ते अंधश्रद्धा, धर्मांधता, विषमता यांनी विकृत झालेल्या भारतीयांचा बौद्धिक-वैचारिक मनोविकास करण्यासाठी धडपडणारा बांधिलकीचा प्रकाशक, ही अरविंद पाटकरची झेप लक्षणियच आहे. अरविंद पाटकरला अलविदा !!!

*....जयवंत हिरे*



आधी धारावीची जमीन घेतली,
मग पुनर्वसनाचं कंत्राट घेतलं...
आता, तिथलं वीजवितरणही घेणार!
टाटा तर जाणारच...
पण, बेस्टही जाणार!
मोदीजींचा हा लाडका 'वामन'
बळीरुपी मुंबईच्या डोक्यावर,
रोज एक एक पाऊल ठेवतोय...
आणि, बळीची लेकरं
आपण मुंबईकर,
आधी मराठी आहोत
की, आधी हिंदू आहोत
या डायलेमात...
धारावीच्या खासदार वर्षा
गायकवाड,
धारावीच्या आमदार ज्योती
गायकवाड
सख्ख्या बहिणी, पक्क्या काँग्रेसी...
तरी हा वामन, धारावी गिळंकृत
करणार...
आणि,
I Love ADANI
या पोष्टरकडे, निर्विकारपणे पाहणारे
आपण सारे, या वाताहतीचे मूक
साक्षीदार !!!

*- आनंद भंडारे*

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

**कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०**